**सुविचार**

एक ईमानदार व्यक्ति कभी किसी अंजान व्यक्ति की नजरों से भयभीत नहीं होता ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ मंगळवार दि. ११ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

नवी दिल्ली : नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या मंत्रिमंडळाचा खातेवाटप जाहीर करण्यात आला असून अमित शाह यांच्याकडे गृहखाते व सहकार खाते कायम ठेवण्यात आले आहे. सर्व महत्त्वाची खाती भाजपने वरिष्ठ मंत्र्यांकडे दिली असून मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात नितीन गडकरी यांना पुन्हा रस्ते आणि परिवहन वाहतूक मंत्रालय, अमित शाह यांना गृह, एस जयशंकर यांना परराष्ट्र, राजनाथ सिंह यांना संरक्षण आणि अश्विनी वैष्णव यांना रेल्वे मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नवीन एनडीए आघाडी सरकारच्या ७१ मंत्र्यांसह शपथ घेतली होती. मोदींच्या या तिसऱ्या मंत्रिमंडळात ३० कॅबिनेट मंत्री, पाच जणांकडे स्वतंत्र प्रभार आणि ३६ राज्यमंत्री आहेत. मोदी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर भाजपने गृह मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालय स्वतः कडे ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालय, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग, सर्व महत्त्वाचे धोरणात्मक मुद्दे आणि इतर सर्व पोर्टफोलिओ जे कोणत्याही मंत्र्याला दिलेले नाहीत, या सर्व खात्यांचा कार्यभार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आहे.


सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची जबाबदारी आता बिहारच्या जितन राम मांझी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे दिग्गज नेते शिवराज सिंह चौहान यांच्याकडे कृषी आणि शेतकरी कल्याण व पंचायत आणि ग्रामीण विकास मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांना ऊर्जा मंत्रालय देण्यात आले आहे. यासोबतच त्यांना नगरविकास मंत्रालयाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. खट्टर हे हरियाणाचे माजी मुख्यमंत्री असून त्यांनी पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक लढवून विजय मिळवला आहे.

श्रीपाद नाईक यांची या खात्यांच्या राज्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, गोव्यातील नेते श्रीपाद नाईक यांची या खात्यांच्या राज्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय भाजपाध्यक्ष जेपी नड्डा यांना आरोग्यमंत्रालय, धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण, गजेंद्र शेखावत यांना कला पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्रालय, सीआर पाटील यांना जलशक्ती मंत्रालय, चिराग पासवान यांना क्रीडा व युवक मंत्रालय, एचडी

**(पान २ वर)**

## पीएम किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी

नवी दिल्ली : - पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी शेतक-यांसाठी पहिला मोठा निर्णय घेतला आहे. पीएम किसान निधीच्या १७ व्या हप्त्याचे प्रकाशन अधिकृत करणाऱ्या फाइलवर त्यांनी स्वाक्षरी केली. याचा ९.३ कोटी शेतक-यांना लाभ होणार असून २० हजार कोटी रुपयांचे वितरण होईल.



दरम्यान, मोदी ३.० सरकारचा पहिला निर्णय देशातील करोडो शेतक-यांना डोळ्यांसमोर ठेवून घेण्यात आला आहे. तिस-यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी पीएम किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत मोदी यांनी काल पंतप्रधान म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतल्यानंतर आज नवी दिल्लीत पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारला. यानंतर त्यांनी या निर्णयावर स्वाक्षरी केली.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही शेतक-यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहोत. कृषी क्षेत्रासाठी अधिक काम करत राहू. यापूर्वी, पंतप्रधान किसान योजनेअंतर्गत, १६ व्या हप्त्याचे पैसे २८ फेब्रुवारी रोजी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाठवले गेले होते.

देशातील शेतक-यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकार पीएम किसान सन्मान निधी योजना राबवत आहे. तथापि, पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत, ही रक्कम एकरकमी नाही तर २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाठवली जाते.

## आता सात राज्यात या १३ जागांसाठी विधानसभेची रणधुमाळी!

नवी दिल्ली : सात राज्यांतील विधानसभेच्या १३ जागांसाठी येत्या १० जुलै रोजी पोटनिवडणूक घेतली जाणार असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाकडून सोमवारी देण्यात आली. विधानसभा सदस्यांचा राजीनामा अथवा त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागांसाठी ही निवडणूक घेतली जाणार असल्याचे आयोगाकडून सांगण्यात आले आहे.





ज्या १३ मतदारसंघात मतदान होणार आहे, त्यात पश्चिम बंगालमधील ४, हिमाचल प्रदेशातील ३, उत्तराखंडमधील २ तर मध्य प्रदेश, पंजाब, बिहार, तामिळनाडूमधील प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. उत्तर प्रदेशातील ९ आमदार अलिकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत निवडून आले आहेत. या जागांसाठी निवडणूक आयोगाला भविष्यात निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. १० जुलै रोजी प. बंगालमधील राणाघाट दक्षिण, रायगंज, बागदा आणि मानिकताला या मतदारसंघांत मतदान होईल. यातील पहिल्या दोन मतदारसंघातील आमदारांनी राजीनामा दिला होता तर इतर दोन मतदारसंघातील आमदारांचे निधन झाले होते.

हिमाचलमधील देहरा, हमीरपूर आणि नालागड मतदारसंघात तेथील आमदारांनी राजीनामे दिल्याने पोटनिवडणूक घ्यावी लागत आहे. उत्तराखंडमधील बदरीनाथ मतदारसंघात राजेंद्र भंडारी यांनी राजीनामा दिल्याने येथे निवडणूक होत आहे. तर अन्य एका मतदारसंघात आमदाराचे निधन झाल्याने तेथे मतदान घ्यावे लागत आहे. मध्य प्रदेश, बिहार आणि पंजाबमधील अमरवाडा, रुपौली आणि जालंधर पश्चिम येथे आमदारांच्या राजीनाम्यामुळे तर तामिळनाडूत विकरावंडी येथे आमदाराच्या निधनामुळे पोटनिवडणूक घ्यावी लागत आहे.

## नीट परीक्षेचा निकाल रद्द करण्यासाठी सुप्रीम कोर्टात याचिका

नवी दिल्ली : नीट परीक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून या याचिकेत नीटचा निकाल रद्द करून फेरपरीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

परीक्षेतील अनियमिततेच्या आरोपांची एसआयटी चौकशी करावी आणि ४ जून रोजी निकालावर आधारित समुपदेशन थांबवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांनी ग्रेस गुण देण्यात मनमानी केल्याचा आरोप केला. या संदर्भात, असा युक्तिवाद करण्यात आला की अनेक विद्यार्थ्यांनी मिळवलेले ७२० पैकी ७१८ आणि ७१९ सारखे उच्च गुण सांख्यिकीयदृष्ट्या अशक्य आहेत.

विशेष केंद्रातील ६७ विद्यार्थ्यांना पूर्ण ७२० गुण मिळाले यावरही याचिकाकर्त्यांनी शंका उपस्थित केली. एनटीएने २९ एप्रिल रोजी प्रकाशित केलेल्या अंतिम उत्तर सूचीबाबत अनेक तक्रारी असल्याचेही सांगण्यात आले. नॅशनल टेंस्टिग एजन्सीद्वारे परीक्षेदरम्यान उशीर झाल्यामुळे ग्रेस गुण देणे ही काही विद्यार्थ्यांना बॅकडोअर एन्ट्री देण्याची वाईट प्रथा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सध्याची याचिका अब्दुल्ला मोहम्मद फैज आणि डॉ. शेख रोशन मोहिद्दीन, मूळचे तेलंगणा आणि आंध्र प्रदेश यांनी दाखल केली होती. याचिकाकर्ते स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाचे कार्यकर्ते आहेत.

लखनौमधील एका विद्यार्थिनीचा व्हीडीओ व्हायरल होत आहे, तिने आरोप केला आहे की, निकालाच्या दिवशी तिला एनटीएकडून एक मेल आला होता ज्यामध्ये लिहिले होते की तिची ओएमआर शीट फाटली आहे ज्यामुळे तिचा निकाल तयार होऊ शकला नाही. अशा परिस्थितीत आयुषी पटेलने व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले आहे की, तिची ओएमआर शीट कोणीतरी जाणूनबुजून फाडली आहे.

## मराठा आरक्षण, संविधान बदलाच्या प्रचाराचा लोकसभेत फटका

मुंबई : (प्रतिनिधी) संविधान बदलणार असा अपप्रचार विरोधी पक्षांनी लोकसभा निवडणुकीत केला व तो खोडून काढण्यात आम्ही कमी पडलो. त्याचा फटका आम्हाला बसला. पण चंद्र-सूर्य असेपर्यंत संविधान कोणीही बदलू शकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. शिव-शाहू-फुले आणि आंबेडकरांचे विचार हा राष्ट्रवादी काँग्रेसचा देखील आत्मा आहे. काहीही झाले तरी हा विचार आम्ही कधीच सोडणार नाही अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आज पक्षाच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात बोलताना दिली. पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी लोकसभा निवडणुकीतील अपयशाची चिरफाड करताना दुरावलेल्या समाजघटकांना सोबत घेण्यासाठी पुढील काळात विशेष प्रयत्न करावे लागतील असे सांगितले. तसेच विधानसभेला शिंदेंच्या शिवसेनेएवढ्याच जागा राष्ट्रवादीला मिळाल्या पाहिजेत अशी मागणी केली.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर हा पहिलाच वर्धापनदिन होता. अजित पवार गटाने मुंबईत तर शरदचंद्र पवार गटाने अहमदनगर येथे पक्षाचा वर्धापनदिन साजरा केला. पक्ष पदाधिका-यासमोर बोलताना अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकांत पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही याबद्दल खंत व्यक्त केली. रायगडच्या एकमेव जागेवर आपल्याला विजय मिळाला आहे. प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पक्षाची लाज राखली. संविधान बदलणार म्हणून विरोधी पक्षांनी खोटे नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना यश मिळाले. सीएएबददल मुस्लिम समाजात संभ्रम निर्माण केला गेला. आदिवासी-दलित समाजात देखील हीच परिस्थिती निर्माण केली गेली.लोकसभा निवडणुकीत कापूस,सोयाबीन,दूध प्रश्र्नांनी फटका दिला. कांद्याने तर पार रडविले. याबाबत देखील मार्ग काढण्यात येणार असल्याचे अजित पवार म्हणाले. पण राष्ट्रवादी पक्ष सरकारमध्ये सहभागी झालेला असला तरी शिव-शाहू-फुले आणि आंबेडकरांचे विचार हा राष्ट्रवादी काँग्रेसचा आत्मा आहे. काहीही झाले तरी हा विचार आम्ही कधीच सोडणार नाही. चंद्र-सूर्य असेपर्यंत कोणी संविधान बदलू शकणार नाही. लोकसभेत अपयश मिळाले असले तरी खचून जाण्याचे कारण नाही. पुन्हा नव्या जोमाने कामाला लागायचे आहे. आम्ही परत एकदा संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढणार आहोत. मी आठवडयातले तीन दिवस मुंबईत तर चार दिवस महाराष्ट्रभरात पक्षाचे काम करणार आहे. येत्या ऑगस्ट पर्यंत राज्यसभेत पक्षाचे तीन सदस्य झालेले असतील. केंद्र सरकारच्या स्थैर्याबददल विरोधक काहीही बोलत आहेत. पण येत्या काही दिवसांतच रालोआची सदस्य संख्या ३०० च्या वर गेलेली दिसेल असेही अजित पवार म्हणाले.





**मुंबई: इन्फोसिस फाउंडेशन व भारतीय विद्या भवन नवी मुंबई, आयोजित भारतीय कला व संस्कृतीच्या प्रचार व प्रसाराच्या प्रमुख निमित्ताने, ग्रीष्मा कल्चरल औट्रीच प्रोग्रॅम अंतर्गत सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांचे भारतीय विद्या भवन, वाशी, नवी मुंबई येथे चक्रीभजन व प्रवचन संपन्न झाले, त्यावेळेस भारतीय विद्या भवन नवी मुंबई चे चेअरमन एम एन रामचन्द्रनं, खजिनदार कविता रामचंद्रनं, संस्थेचे प्रमुख पदाधिकारी, पंडित संजीव चिम्मलगी, लेखक सौ प्रतिभा बिस्वास, सौ.शर्मिला आईसाहेब, ह भ प ज्ञानराज महाराज औसेकर व अनेक मान्यवर उपस्थित होते.**

## नीटच्या परीक्षेतील गैर प्रकाराची तात्काळ चौकशी करा- खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) नॅशनल टेस्टिंग एजन्सी (नीट ) यांच्याकडून ४ मे रोजी देशभरात घेण्यात आली होती. या परीक्षा प्रक्रिया बाबत मोठ्या तक्रारी येत आहेत. अतिशय महत्वाच्या परीक्षेत असा प्रकार होणे हे दुर्देवी आहे. त्यामुळे या परीक्षेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करावी अशी मागणी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी नीटचे महानिदेशक यांच्याकडे एका पत्राद्वारे दि.१० जून रोजी केली आहे.



देशातल्या ५७१ शहरांतील एकूण ४ हजार ७५० केंद्रावर २४ लाख ६ हजार ७९ विद्यार्थ्यांपैकी २३ लाख ३१ हजार २९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेचा निकाल हा दि.१४ जून अपेक्षित असताना संबंधित एजन्सीने या परीक्षेचा निकाल ४ जून रोजी जाहीर केला. परीक्षेत देशात ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० मार्क्स मिळाले आहेत. तर दीड हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क्स दिले आहेत. विद्यार्थ्यांसह पालकांना परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचा संशय आहे. हरियाणातील एका केंद्रावरील प्रश्न पत्रिका उशिरा दिल्याचे कारण देऊन ग्रेस मार्क दिल्यामुळे ४ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० मार्क मिळालेले आहेत. व्यावसायिक परीक्षा सिस्टिम ऑफ एलिमिनेशनवर आधारित आहे. बऱ्याचशा विद्यार्थ्यांना ९१८ - ७१९ असे गुण प्रदान करण्यात आल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये परीक्षांमध्ये गैरप्रकार झाल्याची शंका व्यक्त केली आहे. पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून ही परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. ही परीक्षा भारतातील सर्वात मोठी असण्याबरोबर वैद्यकीय व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची समजली जाते. परीक्षेतील दिलेल्या ग्रेस मार्क्सचा आढावा उच्चस्तरीय समितीमार्फत घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी खा राजेनिंबाळकर यांनी केली आहे.

## लातूरचे कोंग्रेसचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे मताधिक्याने निवडून आल्याबद्दल जिल्हा काँग्रेसने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा केला सत्कार

लातूर / प्रतिनिधी- नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत लातूर लोकसभा क्षेत्रातून काँग्रेस आघाडीचे उमेदवार डॉ शिवाजीराव काळगे हे ६२ हजार मतांनी विजयी झाले त्यांच्या विजयाच्या निमीत्ताने सोमवारी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या आशियाना बंगल्यावर लातूरात जिल्हा काँग्रेस कमेटीकडून माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचे आगमन होताच ढोल, ताशा,तुतारी, प्रचंड फटाक्याची आतषबाजी करत दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ व संविधानाची प्रत देवुन सत्कार करण्यात आला दरम्यान जिल्हाभरातून कार्यकर्ते पदाधिकारी आल्याने आशियाना निवासस्थान गर्दीने हाऊसफुल दिसत होते.



लोकनेते विलासराव देशमुख यांचा बालेकिल्ला असलेला लातूर लोकसभा मतदार संघातून काँग्रेस आघाडीचे उमेदवार डॉ शिवाजीराव काळगे यांचा विजयाचा जल्लोष सोमवारी आशियाना बंगल्यावर काँग्रेस कमेटीकडून करण्यात आला यावेळी माजी आमदार अँड त्रिंबक भिसे,जिल्हा कोंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे शहर कोंग्रेसचे अध्यक्ष अँड किरण जाधव प्रदेश काँग्रेस सचिव अभय साळुंके, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, विलास बँकेचे उपाध्यक्ष अँड समद पटेल, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील, रेणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, माजी महापौर डॉ स्मिता खानापुरे, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ सपना किसवें, संचालिका सौ अनिता केंद्रे, संचालक अनुप शेळके, संचालक राजकुमार पाटील पृथ्वीराज शिरसाठ मारोती पांडे, नीलंगा तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष आबासाहेब पाटील, उदगीरचे श्रीकांत पाटील,सचिन दाताळ, यांच्यासह देवनी चाकुर, शिरूर अनंतपाळ, रेणापूर, लातूर येथील मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## संस्काराचा वर्तनवारसा पुढच्या पिढीकडे सोपविण्याची गरज:संमेलनाध्यक्ष धनंजय गुडसूरकर

### पंढरपूर: साने गुरुजी विचार साहित्य संमेलन

पंढरपूर /प्रतिनिधी -आई आणि शिक्षक या दोन्ही भूमिकांमधून साने गुरुजींनी केलेले वर्तन संस्कारातून समर्पित नागरिकांच्या दोन पिढ्या उभ्या राहिल्या . हाच वारसा पुढील पिढीला देणे ही आपल्या पिढीची जबाबदारी आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांनी साने गुरुजी विचार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना केले .पंढरपूर येथे आयोजित साने गुरुजी विचार साहित्य संमेलनास येथील राऊळमहाराज मठाच्या सभागृहात सुरुवात झाली . पंढरपुरच्या माजी नगराध्यक्ष साधनाताई भोसले यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले .

पंढरपूर येथे आयोजित साने गुरुजी विचार साहित्य संमेलनास येथील राऊळमहाराज मठाच्या सभागृहात सुरुवात झाली . यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले . संयोजक संतोष चौंडावार यांनी संमेलनाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली .

साने गुरुजींच्या १२५ व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून मातोश्री कै . विमल चौंडावार यांच्या स्मरणार्थ पंढरपूर येथील राऊळ मठात साने गुरुजी विचार संमेलनास महाराष्ट्राच्या विविध भागातून साहित्यिक सहभागी झाले आहेत . प्रारंभी साने गुरुजी व कै . विमल चौंडावार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . श्यामची आई पुरतीच साने गुरुजींची ओळख मर्यादित झाल्यामुळे गुरुजींनी केलेली क्रांती आम्ही विसरुन गेलो आहोत, गुरुजींनी स्वातंत्र्यसैनिक, समता सैनिक म्हणून घेतलेल्या भूमिका या त्यांच्या कणखरपणाचे दर्शन घडविणाऱ्या होत्या . एकजूटीची मशाल घेऊन रान पेटविण्याची



भाषा करणारे गुरुजी खऱ्या अर्थाने क्रांतीकारक होते असे आग्रही प्रतिपादन गुडसूरकर यांनी पुढे बोलताना व्यक्त केले . आईच्या प्रेमाच्या परिघाला मोजमाप नाही, आईचा वायदा हा फसवा नसतो असे प्रतिपादन संत साहित्याच्या अभ्यासक प्रा . नसिमा पठाण यांनी यावेळी बोलताना केले . आई म्हणजे मातृत्वाचा महासागर असून या सागराप्रती कायम कृतज्ञ असण्याची गरज उद्घाटक व माजी नगराध्यक्ष साधना ताई भोसले यांनी उद्घाटनपर भाषणात बोलताना केली. यावेळी झालेल्या विविध सत्रात राजेंद्र उगले,(नाशिक ) शशिकला गुंजाळ (वाशी )सविता कुरुंदवाडे ( पुणे ), सौ. विणा व्होरा, सौ . वैशाली सुर्यवंशी, (नाशिक), सौ. उज्वला शिंदे, (भडीशेगाव ), सौ . वंदना कुलकर्णी (सोलापूर ), सौ. छाया उंब्रजकर सोलापूर, सौ. उस्लेषा मोदी,(सांगोला ) रमेश वाघ (नाशिक )अँड . दिलीप कांबळे, (उस्मानाबाद, महेश कोळेकर, (सोलापूर )यांनी सहभाग घेतला . सौ . प्रिया कौलवार यांनी सुत्रसंचालन तर योगेश बडवे यांनी आभार मानले .

# नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्याबद्दल अहमदपूर मध्ये जल्लोष

अहमदपूर दि.१०(कारामुंगीकर) नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान, अहमदपूर मध्ये मोठा जल्लोष करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, जगात लोकप्रिय असलेले नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून विराजमान होताच अहमदपूर शहरात मोठा जल्लोष करण्यात आला. तब्बल बासष्ट वर्षानंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा बहुमान नरेंद्र मोदी यांना मिळाला असल्याने भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोठा जल्लोष करून गुलालाची मोठ्या प्रमाणात उधळण करून संपूर्ण शहरात पेढे वाटून फटाक्यांची अतीषबाजी करून भारतीय जनता पक्षाच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला.



अहमदपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोदींचा जयघोष करण्यात आला. भरपावसात जल्लोष साजरा करतेवेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, ओम पुणे, तालुका अध्यक्ष प्रताप पाटील, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष ओमकार पुणे, डॉ.सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, दत्ता खंदाडे, निखिल कासनाळे,धैर्यशील देशमुख, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष रामानंद मुंडे, रामनाथ पलमटे,अमित रेड्डी, ॲड. अजिंक्य चामे,माणिक नरवटे, महेश बिलापट्टे, परमेश्वर पाटील, कुलदीप हाके, हणमंत देवकते, श्रीकांत देशमुख,रमेश कांबळे, हिंदू नाईक, दत्ता गोरे,रवीशंकर स्वामी, नारायण केरले,मन्नान शेख,बाबाराव बारवाड,अण्णाराव होणराव, अनंत गुट्टे यांच्या सह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोदी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अहमदपूर शहरातील रामजन्मोउत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी गुलालाची उधळण करून संपूर्ण शहर भगवेमय करून आनंद उत्सव साजरा केला.

# ए.एच.रिझवी हायस्कूल, हडोळतीचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

हडोळती दि.१०(नागसेन गायकवाड) : ए.एच.रिझवी हायस्कूल, हडोळतीचे दहावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, हडोळती येथील ए.एच. रिजवी हायस्कूल चा दहावीचा निकाल १००% टक्के लागला असून,शेख इखरा अल्फिया साजिद हिने ८७.४०% गुण घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला तर शेख फिजा बशीर हिने ८६.८०% गुण घेऊन द्वितीय व शेख सिमनफातेमा वाजिद हिने ८४.००% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. विशेष प्राविण्यासह १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत १० विद्यार्थी तर, द्वितीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष अब्दुल मुजीब पटेल जागीरदार, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अ. मजीद जागीरदार, गदवाल एन. आय.,मु.अ.शोएब जागीरदार, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# यशवंत विद्यालयातील १००% गुण घेणाऱ्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांची आकाशवाणीवर मुलाखत

अहमदपूर दि.१०(कारामुंगीकर) यशवंत विद्यालयातील १००% गुण घेणाऱ्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांची आकाशवाणीवर मुलाखत घेण्यात आली.




याबाबत अधिक माहिती अशी की, शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशवंत विद्यालयातील ६ विद्यार्थी १०० %गुण घेऊन यशवंत विद्यालय अहमदपूर या शाळेचे नाव उंचावले आहे.यामुळे ऑल इंडिया रेडिओचे परभणी आकाशवाणी केंद्रावर दि.११ जून रोजी सकाळी ११ वाजता बालमंडळ या कार्यक्रमात गुणवंत ०६ विद्यार्थ्यांचे मुलाखत संपन्न होणार आहे.

वर्षभर विद्यार्थ्यांने कशा पद्धतीने आभ्यास केला,शाळेतील शिक्षकांचे कशा पद्धतीने मार्गदर्शन लाभले. संस्थेने शाळेच्या उन्नतीसाठी केलेले वार्षिक नियोजन या सर्व गोष्टीचे चर्चासत्र या मुलाखतीत शाळेचे गणित विषय तज्ञ शिक्षक गुरुअप्पा बावगे तर कलाध्यापक महादेव खळुरे यांनी शाळेतील गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी केलेले विविध उपक्रम याबाबतीत संवाद साधला आहे.

विद्यालयातील १००% गुण घेणारे विद्यार्थी कु.दिप्ती देशमुख,कु. सायली भगत,आदित्य मुंडे ,कु.नमृता शेटकार,कु.आदिती येरमे,धनराज हंगरगे यांनी मुलाखत दिली आहे.

आकाशवाणी वर मुलाखत दिलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर अशोक सांगवीकर,संस्थेचे सचिव डी बी लोहारे गुरुजी,उपाध्यक्ष डॉ भालचंद्र पैके,सहसचिव डॉ सुनिता चवळे,प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक राजकुमार घोटे,पर्यवेक्षक आशोक पेद्देवाड,रामलिंग तत्तापुरे,सोमनाथ स्वामी, यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# दयानंद विद्यालय, हडोळती येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

डोळती दि.०७(नागसेन गायकवाड) दयानंद विद्यालय, हडोळती येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



याबाबत अधिक माहिती अशीकी, हडोळती ता.अहमदपूर येथील शाळेत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राध्यापक पी .टी. पवार सर , डॉ.निलेश भैय्या पवार, प्राचार्य डॉ. दीपक बच्चेवार ,मुबारक देशमुख, दत्तात्रय कदम पाटील, गिरीशराव देशमुख,माजी प्राचार्य व्यंकटराव मुळके, कार्यकारी संचालक जोगदंड आय.एम., प्राचार्य कौडगावे जि..व्ही. आदींची उपस्थिती होती.

# मानवतेची मैत्री जोडणारा तरुण: डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी

श्रमावर श्रद्धा ठेवून समाधानाने जगण्यास माणूस सदैव सुखी असतो. आयुष्य हा ऊन-सावल्यांचा ,प्रकाश-अंधारांचा हा खेळ आहे. हा खेळ आपण किती आनंदाने खेळतो यावर आपली जीवन यात्रा अवलंबून असते. कित्येक वेळा आनंद आपल्या आवती भवती दडलेला असतो म्हणतात ना मजशी दृष्टी तशी सृष्टी....फअगदी तसेच.....!



अहमदपूरचे युवक धडाडीचे नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी हे आपल्या संवेदनशील मनाच्या माध्यमातून काळजातील प्रेमाच्या ओलाव्यातून मानवतेशी मैत्री जोडून स्वतःची दुःखे विसरून समाजाच्या दुःखाशी ,वेदनांशी जवळीकता साधून समाजाच्या भल्यासाठी रोजच मरण यातना भोगत असताना दिसतात. समाजाच्या विविध प्रश्न, समस्या सोडवताना त्यांना किती त्रास सहन झाला तरी ते समाजाचे प्रश्न अगदी शांतपणे ,संयमपणे सोडवतात हे करताना आपल्या वाणीतून, वागण्यातून पुढच्यांना त्रास होणार नाही याचीही ते काळजी घेतात.

नगरसेवक म्हणून काम करताना नगर परिषेदेपासून ते कलेक्टर ऑफिस ते मंत्रालय या कार्यालयातून कोणते नगर विकास काम कसे मिळवायचे हे त्यांना अगदी चांगले माहित असल्याने जे काम इतरांना जमत नाही ते काम डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी करून दाखवतात .अर्थात नगराचा/ प्रभागाचा विकास करण्यासाठी मंत्रालयापर्यंत जाऊन संबंधित कामाचा ते पाठपुरावा करतात. आपल्या वार्डाचा विकास करण्यासाठी कुठूनही निधी आणून वार्डाचा विकास करतात. आपल्या वार्डात पाणी, लाईट ,रस्ते आधी कामे त्यांनी कधीच पूर्ण केले असून स्मशानभूमी व घरे या कामीही ते नेहमीच अग्रेसर असतात. त्यांच्या वार्डात सर्व मूलभूत गरजा बऱ्याच अंशी पूर्ण झालेल्या आहेत हे त्या वार्डातील लोकांकडून समजते.

ते केवळ वार्डातीलच कामे करतात असे नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक ,शैक्षणिक आदी कामातही त्यांचा नाव लौकिक आहे. सामाजिक काम करताना गीतांच्या व व्याख्यानाच्या माध्यमातून समाजाला प्रबोधन करणे, रुग्णांना फळे वाटप करणे ,महामानवांच्या जयंती-पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर घेणे, डॉक्टर डे सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व स्वच्छता यासंबंधी मार्गदर्शनपर कार्यक्रम राबविणे ,विविध गीत गायण स्पर्धा राबविणे, पालात राहणाऱ्या लोकांना दरवर्षी दिवाळीच्या ताजा फराळ देणे, प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ११०० फूट लांबीच्या तिरंगा ध्वजाची गावातून रॅली काढून लोकांच्या मनात देशभक्ती वृद्धिंगत करणे,कबालनामे मिळवून देणे, स्मशानभूमीच्या विकास करणे आदी कामासाठी आंदोलने करणे अशी अनेक कामे ते सम्राट मित्र मंडळाच्या माध्यमातून करत असतात. त्याच बरोबर विविध हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व कपड्याचे वितरण करणे अशी किती तरी सामाजिक कामे ते पदरमोडीतून करतात. कुठलेही सामाजिक ,धार्मिक काम करताना सामान्य माणसाला ते वर्गणी मागत नाही. त्यांना शक्य झाले तर ते करतात अन्यथा ते शांत राहतात.आज समाजात वावरताना सामान्य माणसाने आपल्या व्यथा, सुख-दुःख कुणाच्यातरी गळ्याला पडून सांगाव्यात अशी चांगली गळे तसेच कुणाच्या पायावर डोके टेकवून कुणाबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करावीत अशी चांगले पाय आणि चांगली माणसे हळूहळू दुर्मिळ होताना दिसत आहेत. हे सत्य असले तरी समाजात अजून भरपूर चांगली माणसे आहेत जे की समाज कार्याला वाहून घेताना दिसतात. त्यात डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांचा आग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

समाजात वावरताना माणसाजवळ कोणते गुण असावेत व कोणते गुण नसावेत हे डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्याकडे पाहिल्यास जाणवते ते मानवी समाजात वावरताना कधीही कोणालाही अपमानस्पद किंवा आक्रमक बोलत नाहीत. अतिशय नम्रपणे भाष्य व वर्तन करतात. ते दारू ,गांजा ,विडी ,सिगारेट ,तंबाखू आदी गोष्ट पासून कोसोदूर आहेत. कधीही आपल्या वाणीतून समोरचा दुखावणार नाही, याची काळजी ते घेतात. अधिकारी व मोठे माणसे यांच्याशी संवाद करताना अगदी आदरपूर्वक भाष्य करतात. खऱ्याला खरे व खोट्याला खोटे म्हणणे हा महत्वाचा गुण त्यांच्यात आहे. खरे बोलण्यास आजच्या काळात अनेक प्रकारची हानी होते पण जे सत्य आहे ते सत्यच बोलतात खोटी स्तुती त्यांना आवडत नाही.

स्वतःच्या शिक्षणात ही ते कमी नाहीत .ते उच्चशिक्षित आहेत.नव्हे ते अजूनही शिक्षण घेतच आहेत.ते भूगोल सारख्या अवघड विषयात ( शिक्षणात ) पी.एच.डी आहेत. त्यांच्यातील नम्रता, स्पष्टवक्तेपणा आणि फक्कड वक्ता हे निसर्गाने त्यांना दिलेली खूप मोठी देणगीच आहे. याचा वापर ते योग्य ठिकाणी व योग्य पद्धतीनेच करतात.

या सर्व गोष्टीतून एकच गोष्ट प्रकर्षणाने जाणवते आणि ती म्हणजे ते मानवाशी, मानवतेशी मैत्री भावाने वागतात म्हणूनच त्यांची गणना चांगल्या व्यक्तीत केली जाते .अशा या चांगल्या व्यक्तीचा आज वाढदिवस.या निमित्ताने त्यांना आभाळभर शुभेच्छा देताना त्यांना भरभरून आयुष्य लाभावे. असेच मानवतेची सेवा करण्याचे ङ्गबळफ त्यांना भविष्यात लाभावे अशी भावना निसर्गाकडे व्यक्त करतो...!



**विलास चापोलीकर**
अहमदपूर
९८५०२७३०४७

# लोकसभेला पंकजाताईचा पराभव झाल्याने समर्थक कार्यकर्त्याची आत्महत्या

## जिल्हाअध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी दिली सांत्वन पर भेट



अहमदपूर दि.१०(प्रतिनिधी) लोकसभेला पंकजाताईचा पराभव झाल्याने समर्थक कार्यकर्त्यानी आत्महत्या केल्यामुळे जिल्हाअध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी दिली सांत्वन पर भेट दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर पासून जवळच असलेल्या मौजे येस्तार येथील सचिन मुंडे यांनी बीड लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंढे यांचा पराभव झाल्याने यांच्या समर्थक सचिन मुंढे या तरुणाने पराभव सहन न झाल्याने अहमदपूर ते येलदरी मुक्कामी जाणाऱ्या बोरगाव पाटीवर एसटी खाली उडी मारून आत्महत्या केली असल्याने आज भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी मौजे येस्तार येथील मुंडे यांच्या निवासस्थानी भेट देवून कुटुंबाचे सात्वंन करून त्यांच्या आई वडिलांना धीर दिला .

यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, तालुकाध्यक्ष प्रताप पाटील, ॲड.निखिल कासनाळे, काशिनाथ स्वामी,युवा मोर्चाचे शहराध्यक्ष ओमकार पुणे,रविशंकर स्वामी, सरपंच बंडू ढाकने, माधव ढाकणे, बाबुराव ढाकणे, पवन महाराज ढाकणे बंडू ढाकने, माधव ढाकणे, व गावातील ज्येष्ठ नागरिक ग्रामस्थ, नातेवाईक यावेळी उपस्थित होते.

यशवंत
मंगळवार दि. ११ जून २०२४
३
धाराशिव जिल्हा
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# वर्ग २ जमिनीबाबत समितीने तात्काळ अहवाल सादर करा

## शेतकरी बचाव कृती समितीची मागणी



धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील वर्ग २ मधील जमिनी वर्ग १ मध्ये घेण्याबाबत नेमलेल्या समितीकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे संबंधित समितीला तात्काळ अहवाल सादर करण्याचे सूचित करण्यात यावे, अशी मागणी शेतकरी बचाव कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे दि.१० जून रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जिल्हा शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्यावतीने वर्ग २ च्या जमिनी पुन्हा वर्ग १ मध्ये घेण्याबाबत गेल्या २ वर्षांपासून सतत आंदोलन करण्यात येत आहे. समितीच्या या लढ्याची दखल घेऊन मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी यशस्वी मध्यस्थी केली. त्यानंतर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन १ महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. परंतू अद्यापही समितीकडून अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

धाराशिव जिल्ह्यातील जवळपास साडेबारा हजार एकर इनामी, मदत्मास, खिदमत मास सीलिंग जमिनी व महार वतन जमीन वर्ग १ मधून वर्ग २ मध्ये घेतल्यामुळे शेतकरी व प्लॉट धारकांवर मोठा अन्याय झालेला आहे. महाराष्ट्रात केवळ धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी व प्लॉटधारकांमध्ये असंतोष पसरला आहे. त्यामुळे शेतकरी बचाव कृती समितीच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून आक्रोश मोर्चा, उपोषण, धरणे आंदोलन, जागरण गोंधळ अशा विविध आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले. तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्ह्याचे पालकमंत्री, स्थानिक खासदार, आमदार यांना निवेदने देऊन पाठपुरावा केला. तसेच राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना, मंत्री विखे – पाटील व इतर अधिकार्यांसमवेत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. त्यानंतर मंत्री विखे – पाटील यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे आदेश जारी केले. त्या समितीकडून १ महिन्यामध्ये शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देश मंत्री विखे – पाटील यांनी दिले होते. परंतू अद्यापही समितीकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे संबंधित समितीला तात्काळ अहवाल सादर करण्याचे सूचित करण्यात यावे, अशी मागणी केली आहे. निवेदनावर समितीचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे, कार्याध्यक्ष राजाभाऊ बागल, फेरोज पल्ला, इलियास मुजावर, अल्लानूर शेख, उमेश राजेनिंबाळकर, सुरेंद्रनाथ मालशेटवार, सतीश कदम, दिलीप राऊत, प्रा. अविनाश मोरे, जयसिंग हजारे, राजू उंबरे, मदन पवार, नवनाथ कांबळे, शीतल पवार, प्रमोद पवार, संजय पवार, अभिजित पवार, अभिजित गिरी, संतोष कुलकर्णी, सुलभा कुलकर्णी, सतीश पाटील, सरफराज पटेल, ॲड. परवेज काझी, शकील सय्यद आदींसह शेतकरी, प्लॉटधारकांच्यि सह्या आहेत.

# शेतकरी विरोधी केंद्रीय परिपत्रकावर आक्षेप – आ. पाटील

## २५ जूनला होणार राज्य तक्रार समितीची बैठक



**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र शासनाने अचानकपणे काढलेल्या दि.३० एप्रिलच्या परिपत्रकाविरुद्ध राज्य समितीकडे याचिका दाखल केली आहे. तर जून २०२३ च्या परिपत्रकानुसारच विमा नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांच्यासह मी केली आहे. तसेच दि.२५ जून रोजी सुनावणी होऊन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी व्यक्त केली आहे.**

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – खरीप २०२३ चा पीक विमा मिळताना केंद्र सरकारच्या एका परिपत्रकामुळे शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या विरोधात राज्य तक्रार निवारण समितीकडे याचिका दाखल करीत कृषी विभागाच्या सचिव आय.ए. कुंदन यांची भेट विमा अभ्यासक अनिल जगताप व आमदार कैलास पाटील यांनी दि.१० जून रोजी घेतली. यावेळी कुंदन यांनी दि.२५ जून रोजी समितीची बैठक आयोजित केली असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

पीक विमा अभ्यासक अनिल जगताप व आमदार कैलास पाटील केंद्र शासनाने काढलेल्या दि.३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रक विरुद्ध प्रशासनाला जाब विचारला. राज्यातील शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत राज्य तक्रार निवारण समितीकडे याचिका दाखल केली. या परिपत्रकामुळे महाराष्ट्रातील ७५ टक्के शेतकऱ्यांचे नुकसान होत असून सरसकट नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित राहत आहेत. तर चालू खरीप हंगामात जिल्ह्यातील ५ लाख ६० हजार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी पीक विमा भरला. त्यापूर्वी कंपनीला ६३९ कोटी रुपये रक्कम देणे होते. सुरुवातीला २१ दिवस पावसाचा खंड पकडून जिल्हाधिकाऱ्यांनी एक अधिसूचना काढली. त्यात जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना २५४ कोटी रुपये अग्रीम रक्कम देण्यात आली. नंतर सप्टेंबर ऑक्टोबरमध्ये पाऊस झाल्याने १ लाख ९२ हजार शेतकऱ्यांनी वैयक्तिक पूर्व कल्पना देत नुकसानीची माहिती विमा कंपनीला दिली. मात्र केंद्र शासनाने दि.३० एप्रिल २०२४ रोजी परिपत्रक काढून एखाद्या महसूल मंडळातील विमा भरलेल्या क्षेत्रापैकी २५ टक्के क्षेत्रापेक्षा जास्त पूर्व सूचना आल्या तर वैयक्तिक नुकसानीपासून ते मंडळ वंचित ठेवण्याचा अजब फतवा काढला आहे. या परिपत्रकानुसार जिल्ह्यात फक्त ३७ हजार ५७४ शेतकऱ्यांना ३९ कोटी ५२ लाख रुपये वितरित केले आहेत. तर या नवीन नियमाचा फटका बसून जिल्ह्यातील ३२ महसूल मंडळाला एकही रुपया मिळालेला नसल्यामुळे नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित राहिले आहेत. नवीन परिपत्रका नुसार सरसकट शेतकऱ्यांना केवळ प्रती हेक्टर ३ हजार ५०० हजार रुपये नुकसान भरपाई मिळणार आहे. यापूर्वी ५ हजार रुपये अग्रीम दिल्याने १ हजार ५०० रुपये विमा कंपनीला परत देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतकऱ्यांवर होत असलेला हा अन्याय लक्षात घेऊन अनिल जगताप व आमदार कैलास पाटील यांनी थेट दि.१० जून रोजी राज्य तक्रार निवारण समितीकडे याचिका दाखल केली. पीक विमाबाबत दि.२६ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य तक्रार निवारण समितीकडे याचिका दाखल करता येते. त्याप्रमाणे ही याचिका दाखल केली आहे. कृषी विभागाच्या प्रधान सचिव कुंदन यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी याविषयी २५ जून रोजी सुनावणी घेणार असल्याचे सांगितले. तर दि.३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक रद्द करावे व दि.२६ जून २०२३ च्या परिपत्रकानुसार नुकसान भरपाई देण्यात यावी अशी प्रमुख मागणी आ पाटील व जगताप यांनी केली आहे.

## सर्व कलावंतांनी आपली वैचारिक भूमिका स्पष्टपणे मांडली पाहिजे – बेडेकर

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – कला क्षेत्रामध्ये ४२ वर्षापासून संस्कार भारती देशात कला क्षेत्रामध्ये आपल्या विचारांची पेरणी करत आहे. काल परत्वे नवी आव्हाने लक्षात घेता सर्व कलावंतांनी आपली वैचारिक भूमिका स्पष्टपणे मांडली पाहिजे असे प्रतिपादन संस्कार भारती अखिल भारतीय मंत्री रवींद्र बेडेकर यांनी दि.९ जून रोजी केले.

धाराशिव येथील तुळजापूर रोड ग्रीनलँड हायस्कूल येथे ८ व ९ जून रोजी पार पडलेल्या देवगिरी प्रांत वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, प्रा.जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, अध्यक्षा स्नेहलताई पाठक, महामंत्री डॉ जगदीश देशमुख, माजी अध्यक्ष भारत लोळगे, प्रांत चित्रकला प्रमुख शेषनाथ वाघ, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल ढगे, सचिव प्रभाकर चोराखळीकर, धाराशिव शहर संयोजक शरद वडगावकर, अरविंद देशमुख प्रांत कार्याध्यक्ष भगवानराव देशमुख, विद्यासागर पांटणकर, सुनिता घाटे, दत्तप्रसाद गोस्वामी, मोहन रावतोळ, सह कोषप्रमुख, संजय घायाळ, उप प्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हणकर, सुशील कुलकर्णी, अविनाश धट, प्रफुल्लकुमार शेटे, अपर्णा शेटे, अंजली विळेगावे, सार्थकी वाघ, गणेश कसपटे, लक्ष्मीकांत सुलाखे, प्रसाद महानुनी, संदीप रोकडे, अनिल मालखरे, महादेव केसकर, अक्षय भन्साळी , अमृत जावळे, सत्यहरी वाघ, सुधीर पवार आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वर्षाराणी कुदळे, शरद वडगावकर, आकाश पाटील यांनी आपली गाणी सादर केली. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्यामसुंदर भन्साळी यांनी तर सूत्रसंचालन प्रभाकर चोराखळीकर व डॉ सतीश महामुनी यांनी तसेच उपस्थितांचे आभार भन्साळी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने झाली.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन साजरा

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २५ वा वर्धापन दिन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयात धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड यांच्या हस्ते पक्षाचा ध्वज फडकावून दि.१० जून रोजी साजरा करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास धाराशिव शहर कार्याध्यक्ष मनोज मुदगल, सेवा दल जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव,आदिवासी सेल जिल्हाध्यक्ष नानासाहेब पवार, धाराशिव युवक तालुकाध्यक्ष बालाजी शिंदे, विद्यार्थी जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अरफात काझी, अल्पसंख्यांक महिला शहर कार्याध्यक्ष अमिना शेख, सोशल मीडिया धाराशिव सुहास मेटे, धाराशिव तालुका सचिव प्रताप शिंदे, केशेगाव जि.प. गटप्रमुख लिंबराज लोखंडे, अंबेजवळगे जि.प. गटप्रमुख सुरेश राठोड आदी उपस्थित होते.



## पत्रकारांच्या १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन – सय्यद

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – धाराशिव तालुक्यातील पत्रकारांच्या १० व १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार व्हाईस ऑफ मीडिया धाराशिव तालुक्याच्यावतीने लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती व्हाईस ऑफ मीडियाचे धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद यांनी दिली आहे.

पत्रकार हा समाजाच्या सर्व घटकातील विद्यार्थ्यांचे आपल्या लेखणीतून कौतुक करतात. मात्र पत्रकारांच्याच गुणवंत पाल्यांचा ते सत्कार करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे त्यांच्या गुणवंत पाल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्यामध्ये एक नव चैतन्य निर्माण करण्यासह प्रेरणा देण्यासाठी या सत्कार सोहळ्याचे आयोजन दि.१५ जून २०२४ पर्यंत तालुक्यातील पत्रकारांनी आपल्या पाल्यांचे नाव नोंदणी तालुकाध्यक्ष अमजद सय्यद यांच्याकडे करावी. हा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम धाराशिव शहरात आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे धाराशिव तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या इयत्ता १० वी व १२ वी मधील उत्तीर्ण झालेल्या पाल्यांचे नाव व्हाईस ऑफ मीडियाकडे कळवावीत. तसेच कार्यक्रमाची तारीख लवकरच कळविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने हा पत्रकारांच्या पाल्यांना प्रोत्साहन देणारा कार्यक्रम प्रथमच आयोजित केला असल्यामुळे जास्तीत जास्त पत्रकारांनी आपल्या पाल्यांसह सहकुटुंब उपस्थित रहावे, असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन साजरा

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापनेला २५ वर्षे पुर्ण झाली असून पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांनी १० जून १९९९ रोजी स्थापन केला. गेल्या २५ वर्षामध्ये देश व राज्य पातळीवर पक्षाने विविध क्षेत्रामध्ये उल्लखनिय कामगिरी केली. आज २६ व्या वर्धापन दिनानिमित्त धाराशिव येथील राष्टलवादीच्या कार्यालयात राष्टलवादीचे नेते संजय निंबाळकर यांच्या हस्ते महात्मा गांधी व कै .यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पक्षाच्या झेंड्याचे झेंडावंदन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर हे होते.

याप्रसंगी उपस्थितांना संजय निंबाळकर यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत पक्षाचे नेते शरदचंद्रजी पवार यांच्याकडून प्रेरणा घेवून पक्षवाढीसाठी काम करावे असे आवाहन केले. तसेच त्यांनी देशाचे नेते शरदचंद्रजी पवार, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, खा. संसदरत्न सुप्रिया सुळे, खा. अमोल कोल्हे यांच्यासारखी दिग्गज मंडळी आपल्या कामाचा प्रभाव देश व राज्य पातळीवर दाखवत असताना नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या



निवडणूकीत पक्षाने १० पैकी ८ जागा जिंकून सामान्य माणसांसाठी पक्ष उपयोगाला येत असल्याचे मतदानातून सिध्द केले आहे. तसेच जिल्ह्यातील पक्ष वाढीसाठी महिला, युवक, शेतकरी, कामगार, मागास, अल्पसंख्यांकाच्या प्रश्नाला यापुढील काळात न्याय मिळण्यासाठीच्या लढाईत आपापले योगदान द्यावे व हिरीरीने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भालचंद्र बिराजदार, मुस्ताक हुसेनी, नरदेव कदम, सुरेश टेकाळे, विठ्ठल माने, बालाजी डोंगे, मनोहर हारकर, डॉ. मोहन बाबरे, डॉ. सिद्धाप्पा ताडेकर, सुदन पाटील, ॲड. प्रविण शिंदे, अमर गुंड, रणवीर इंगळे, अनिल जाधव, इकबाल पटेल, रमाकांत हजारे, भारत शिंदे, सागर चिंचकर, बालाजी तांबे, निलेश काकडे, राजेंद्र मोरे, दिलीप परिट, गणपत चव्हाण, नानासाहेब हंगे, नामदेव चव्हाण, पांडूरंग थोरात, महादेव थोरात, मारुती गरड, जीवनराव बर्डे, बाळासाहेब कणसे, इम्रान पठाण, सरदार पटेल, मदन पाटील, अरुण जाधव, शौकत मुजावर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुरेश टेकाळे यांनी मानले.

# शिष्यवृत्तीच्या प्रलंबित अर्जाचा तातडीने निपटारा करा

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – महाडीबीटी पोर्टलवरील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले शिष्यवृती अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य व महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२३-२४ या वर्षासाठी महाडिबीटी पोर्टलवर योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी पोर्टलवर भारत सरकार शिष्यवृत्ती, फ्री शिप व राजर्षि छत्रपती शाहू महाराज मेरीट शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू झाल्यापासून ऑनलाईन प्रणालीवर अर्ज नोंदणी व अर्जाची पडताळणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

दि.३० मे अखेर महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर वरील शिष्यवृत्ती अर्जाची संख्या मोठ्या प्रमाणात प्रलंबित दिसुन येत आहे. त्यामुळे सर्व प्राचार्यांनी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज अचूक पडताळणी करुन तसेच विद्यार्थी स्तरावरील अर्जाची त्रुटींची पूर्तता करुन घेऊन प्रलंबित अर्ज दि.१४ जूनपर्यंत परीपुर्ण अर्ज सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयास पाठवावेत. तसेच ५ पेक्षा जास्त प्रलंबित अर्ज असलेल्या महाविद्यालयांची संख्या पुढीलप्रमाणे – कै.प्रभाकर भस्मे कनिष्ठ महाविद्यालय, लोहगाव – ५ अर्ज, जयप्रकाश विद्यालय – ५ अर्ज, डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्था, रुईभर संचालित श्री स्वामी समर्थ आर्ट आणि सायन्स कॉलेज मुरुम प्रलंबित अर्ज संख्या – ६, जय प्रकाश विद्यालय – ५, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, मुरुम – ६, तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, उस्मानाबाद – ६, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कृषी तंत्रनिकेतन,येडशी तालुका – येडशी – ७, डॉ. के.डी. शेंडगे उच्च माध्यमिक शाळा, उमरगा – ७, पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पदन पदविका विद्यालय,मु.वाशी फाटा, वाशी – ७, सर्वोदय शिक्षण संस्था संचालित कृषी तंत्रनिकेतन वाशी – ८, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालय – ११, आनंद ग्राम कृषी विकास मंडळे महारुद्रप्पा मोटे कॉलेज ऑफ फार्मसी गीरवली तालुका भूम – १२, श्री साई जनविकास प्रतिष्ठानच्या सौ शारदादेवी पंडित पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट आळणी – १३, ज्ञानप्रबोधिनी सोलापूर संचालित कृषी तंत्र विद्यालय तोरंबा ता.लोहारा – १४, नवीन उस्मानाबाद जिल्हा बालविकास समिती संचालित महानंदा बी.एड. कॉलेज – १६, श्री. वेंकटेश उच्च माध्यमिक आश्रमशाळा घाटंगरी – १७, मधुकरराव चव्हाण चँरीटेबल ट्रस्ट अनदुर सलगरा संचालित मधुशाली आर्ट, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज – १७, श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालय – १७, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ के. टी. पाटील बीएससी संगणक विज्ञान महाविद्यालय – १८, जवाहर विद्यालय अणदूर – १८, शिवशक्ती संगणक विज्ञान महाविद्यालय – २७, के.टी.पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग – ४७, श्री.छत्रपती शिवाजी जुनिअर कॉलेज उमरगा – ११६ असे एकूण ४०६ प्रलंबित अर्ज आहे. त्यामुळे वरील महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित असून पाचपेक्षा कमी अर्ज महाविद्यालय महाविद्यालयाची संख्या १५० आहे. महाविद्यालय स्तरावर अथवा विद्यार्थी लॉगिनवर अर्ज प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील, या संदर्भाने भविष्यात शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कबाबत इतर मागास बहुजन कल्याण विभाग जबाबदार नाही याची सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने गांभीर्याने नोंद घ्यावी, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

# शिवा संघटनेकडून म. बसवेश्वर जयंती साजरी भव्य शोभायात्रा सह सभेचे आयोजन







देगलूर: शिवा संघटना देगलूर शाखेच्या वतीने प्रति वर्षा प्रमाणे यंदाही महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त भव्य शोभायात्रा व सभेचे आयोजन करण्यात आले.

म.बसवेश्वर यांच्या ८१९ व्या जयंती निमित्त ७ जून रोजी दुपारी ४ वाजता शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी श्री ष.ब्र.१०८ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,श्री. ष. ब्र.१०८ शंकरलींग शिवाचार्य महाराज हनेगावकर,शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, आमदार जितेश अंतापुरकर,माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार,माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार,अनिल शेटकार,संभाजी बुट्टे आदी उपस्थित होते. सन २००४ पासून म्हणजेच मागील २१ वर्षांपासून शिवा संघटनेच्या वतीने देगलूर शहरांमध्ये शोभायात्रा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. हि भव्य शोभायात्रा शुक्रवार सायंकाळी पाच वाजता देगलूर येथील गांधी पुतळ्या पासून प्रारंभ होऊन नविन सराफा - महात्मा बसवेश्वर चौक - जुना सराफा ते लोहिया मैदान - डॉ.एकलारे यांचा जुना दवाखाना-भारत फॅन्सी कॉर्नर ते नगरेश्वर मंदिर येथे शोभायात्रेचे समारोप भव्य अशा झाले.

या शोभायात्रेत ढोल ताशा, भजनी मंडळ,विशेष म्हणजे महिला भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कलश धारी महिला भगिनी, टाळ मृदंगाच्या निनादात सर्व समाज बंधू भगिनी हजारोंच्या उपस्थित होते. नगरेश्वर मंदिर सभागृहात आयोजित सभेमध्ये श्री सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज हनेगावकर यांनी वीरशैव समाज,त्यांचे संस्कार, इष्टलिंग पूजेचे महत्व , आई वडिलांची सेवा म्हणजे ईश्वर सेवा असून सर्वांनी आपल्या संस्कृतीचे जतन करावे असे सांगितले.

यावेळी उद्योजक अनिल शेटकार यांनी समाजातील युवकांनी शिक्षणानंतर नौकरीवर अवलंबून न राहता उद्योगाकडे वळावे असे आवाहन केले. त्यासाठी ते सदैव मार्गदर्शन करण्यासाठी. तयार असल्याचे सांगितले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे यांनी शिवा संघटनेचा आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेत राजकीय क्षेत्रात शिवा संघटना कशी निर्णायक भूमिका निभावत असून त्याचे उदाहरण म्हणजे नांदेड लोकसभेचा परिणाम होय. ते म्हणाले की शिवा संघटना ही तळागाळातील लोकांपर्यंत सेवा देण्याचं अविरत कार्य करत असून यापुढेही सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य करत राहील असे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे यांनी केले.

त्यांनी शिवा संघटनेच्या बांधणीत देगलूर तालुक्याचा सर्वात मोठा वाटा असल्याचा सार्थ अभिमान आहे असे म्हणाले. कार्यक्रमात भजनी मंडळाचे अध्यक्ष कैलासवासी अशोक पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला. म.बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित शोभायात्रा व मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवा संघटनेचे तालुका अध्यक्ष अशोक मजगे,कर्मचारी महासंघाचे तालुका अध्यक्ष विश्वनाथ पाटील,सोशल मीडिया प्रमुख दत्ता चैनपुरे आणि सर्व आजी माजी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम केले.

# खबरदारी हीच सुरक्षा, पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क रहा !

## महावितरणचे नागरिकांना आवाहन

लातूर, दि.१० जून : पावसाळयात पाऊस व वादळी वाऱ्यामुळे महावितरणच्या वीजयंत्रणेला मोठा फटका बसत असतो. विजेच्या तारा तुटने, विजेचे खांब कोसळणे, रोहित्र कोसळणे त्याचबरोबर करंट उतरणे अशा घटना घडत असतात. त्यामुळे काही प्रसंगी दुर्घटनाही घडतात. त्यामुळे पावसाळ्यात होणारे संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.

मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वाहीनीच्या तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. विजेच्या पोलला हात लावू नये. खांबाच्या स्टेवायरला गुरे-ढोरे बांधू नयेत तसेच कपडे वाळत घालण्यासाठी स्टेवायरचा वापर करू नये. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. अपार्टमेंटच्या मीटर बॉक्सची स्वच्छता राखावी भिंतीमध्ये पाणी मुरणार नाही याची काळजी घ्यावी. स्वीच बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या वायरला जोड देऊ नये. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्वीच तत्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्वीच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. अशा प्रसंगी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. अशा स्थितीत संभाव्य धोका टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

येथे करा संपर्क शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी वा तक्रारीसाठी २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरवर संपर्क करता येईल. टोलफ्री क्रमांकाद्वारे केलेल्या सर्व तक्रारी सीआरएम सॉफ्टवेअरमध्ये नोंदविल्या जातात आणि निपटारा करण्यासाठी एसएमएस पाठवून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याला देण्यात येतात. यासाठी ग्राहकांनी १९१२,१८००२१२३४३५, किवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच लातूर जिल्हयाच्या ७८७५७६२०२१ या सनियंत्रण कक्षाच्या मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा सदरील क्रमांकावरती व्हॉटसप सेवाही कार्यरत असल्याने टेक्स्ट मेसेजसह तक्रारींशी निगडीत फोटोही वीजग्राहकांना शेअर करता येणार आहेत.

## दिपक पाटील राजूरकर यांना मातृशोक

देगलूर (प्रतिनिधी): देगलूर शहरापासून जवळच असलेल्या मुखेड तालुक्यातील



राजुरा (खुर्द) येथील रहिवासी अनुसयाबाई जगदीशराव पाटील राजूरकर (वय ८३) यांचे प्रदीर्घ आजाराने सोमवारी पहाटे चारच्या सुमारास निधन झाले. सामाजिक कार्यकर्ते तथा कंत्राटदार दिपक पाटील राजूरकर यांच्या त्या मातोश्री होत.

सोमवारी दुपारी राजुरा येथे अनुसयाबाई पाटील यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दिपक पाटील राजूरकर, राजू पाटील राजूरकर, गोटू पाटील राजूरकर यांच्या त्या मातोश्री होत. अंत्यसंस्कारास राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, आप्तस्वकीय, मित्रपरिवार, राजुरा व परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

# लातूर येथील विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलच्या नव प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत



औसा (प्रतिनिधी) मागील २० वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मधील वेगवेगळया युनिटनी उत्तुंग भरारी घेतलेली असताना सदरील संस्थे अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लातूर शहरामध्ये आणखीन एक शैक्षणिक संकुल विश्वेश्वरय्या पब्लीक स्कुल ची सुरुवात करण्यात आलेली आहे. यावेळी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, संचालिका अलकनंदा हुरदळे, दिपाली धाराशिवे, शुभांगी धाराशिवे, गोपाळ दंडिमे प्राचार्य, विश्वेश्वरय्या औद्यौगीक प्रशिक्षण संस्था, प्रविण साबदे, प्राचार्य अंकुश बिडवे यांनी केले.

या शाळेचे उद्घाटन दि. १४ जून २०२४ वार शुक्रवार रोजी गुरुवर्य श्री गहिनीनाथ महाराज औसेकर, अध्यक्ष, श्री विठ्ठल रक्मिणी मंदीर देवस्थान, पंढरपुर यांच्या शुभहस्ते व संस्थेचे अध्यक्ष श्री शिवचरणजी धाराशिवे यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या पॉलिटेक्निक प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, गोपाळ दंडिमे प्राचार्य, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे, ब्ल्यू बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर यांची उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदरील उद्घाटन समारंभास लातूर शहर व परीसरातील नागरीकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी केले.

# धनेगाव येथील गौरीशंकर विद्यालयाचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

धनेगाव:लातूर तालुक्यातील धनेगाव येथील श्री. गौरीशंकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखत यंदाही दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.

यावर्षी शाळेचा एकूण निकाल ९६.२९% लागला असुन एकूण २७विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यात १२ विद्यार्थी विशेष प्रविण्यात,११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.शाळेचा विद्यार्थी कांबळे अमोल उद्धव याने ९०.४०% मिळवून प्रथम क्रमांक पटकावला,गीता अमोल वाघमारे हिने ८८.४०% द्वितीय व राधा गोपाळ कांबळे हिने ८५.८०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री गौरीशंकर विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री.हणमंतराव पाटील,नूतन अध्यक्ष श्री.रत्नदीप पाटील,सचिव ॲड. प्रवीण पाटील व सर्व संचालक,शाळेचे मुख्याध्यापक श्री.वसंतराव जाधव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुणवंतांचे व पालकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान बियाणे वाटपात घोळ अल्पभुधारक शेतकऱ्याची नावे गायब

## कृषी विभागाचा सावळा गोंधळ

**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : खरीप हंगाम जवळ येऊन ठेपला आहे. त्यामूळे शेतकरी मशागत करून पेरणीसाठी शेत तयार करण्यात व्यस्त आहेत. मोठा पाऊस पडताच पेरणीची लगबग सुरू होणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या बियाणांचे नियोजन शेतकरी करीत आहेत. त्यातच शिरूरआनंतपाळ तालुका कृषी विभागाने विविध पिकांचे बियाणे वाटप करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन केले होते.

त्यामुळे शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळसह अनेक गावातील अल्पभुधारक शेतकर्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी शे दोनशे रुपये खर्च करुन नोंदनी केली होती. यामध्ये पीक प्रात्यक्षिकमध्ये निवड झालेल्या शेतकऱ्यांना एका एकरासाठी लागणारे बियाणे मोफत मिळणार होते. माञ अनेक अल्पभुधारक शेतकर्यांनी पोर्टलवर नोंदनी करुनही अल्पभुधारक शेतकर्यांऐवजी श्रीमंत असलेल्या एकाच घरातील दोन दोन शेतकर्याची मोफत अनुदान बियाणे यादीवर नावे आली आहेत. शेतकऱ्यांनी सीएससी केंद्रावर जाऊन महाडीबीटीच्या mahadbt. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आपल्याला लागणाऱ्या बियाणांसाठी शे दोनशे रुपये खर्च करून अर्ज नोंदनी केली होती माञ एवढा खर्च करूनही अल्पभुधारक शेतकर्याची नावेच आली नाहीत. पोर्टलवर सातबारा, आठ अ, बैंक पासबुक, आधार कार्ड झेरॉक्स साठी शे दोनशे केलेला खर्च कृषी विभाग देणार का ?असा सवाल शेतकरी करत आहेत.

# जेईई परीक्षेत 'दयानंद'ची उत्तुंग भरारी







**लातूर / प्रतिनिधी-** राष्ट्रीय पातळीवर आयआयटी स्तराच्या प्रतिष्ठित कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी झालेल्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल रविवारी लागला असून या परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

यात वैभवी धनंजय जाधव या विद्यार्थिनीने (AIR 527 GEN- EWS) मार्क मिळवून महाविद्यालयातून प्रथम क्रमांक, गणेश अनिल कांबळे या विद्यार्थ्याने (AIR 763 SC) मार्क मिळवित व्दितीय तर रुतीका शरद क्षीरसागर या विद्यार्थिनीने (AIR ४५५५) मार्कासह तृतीय येण्याचा मान मिळविला आहे. परीक्षा ३२ विद्यार्थ्यांने दिली, त्यापैकी ११ विद्यार्थी आयआयटीमध्ये पात्र झाले आहेत. विद्यार्थ्यांनी जेईई-ॲडव्हान्स परीक्षेत यशाची परंपरा राखली आहे. यावर्षी गुणवत्तेत वाढ झाली आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललीतकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, सीईटी सेलचे चेअरमन डॉ. चेतन सारडा, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्रा. भाऊसाहेब सरवदे, डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, डॉ. व्ही. सी. पाटील, पर्यवेक्षिका डॉ. एस. एस. वाडीकर, जेईई समन्वयक प्रा. रवी कुमार, सीईटी समन्वयक प्रा. के.जी. जाधव, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, एम. बी. कोराळे यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात कौतुक करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.
















**आज जवळगा येथे शिवनाम सप्ताहाचे संमाप्ती चा कार्यक्रम करण्यात आला .यावेळी श्री शिवाजी धानुरे गुरुजी , परमेश्वर बिरादार गुरुजी सेवा निवृत झाल्या मुळे रामलिंग शिक्षण प्रसारक मंडळ जवळगा चे अध्यक्ष तथा माजी सरपंच प्राचार्य रामलिग मुळे व रामलिंग शिक्षण प्रसारक मंडळ जवळगा चे सचिव अनिल मुळे याच्या हस्ते सत्कार करण्यात आला ,तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आला. यावेळी श्री शंभूलिंग शिवाचार्य महाराज व ग्रामस्थ उपस्थित होते.**

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. ११ जून २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com




## खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा सत्कार

धाराशिव दि१०(प्रतिनिधी) – खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दुसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल सातलिंग स्वामी यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी वीरशैव सभेचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्लकुमार शेटे, वीरशैव सभा जिल्हाध्यक्ष, धाराशिव जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे प्रदेश सहसचिव, वीरशैव सभेचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन वाले, गणेश खराडे ,पत्रकार संजय रेणुके, भिमाशंकर यादगौडा, आप्पा देशमुख आदी उपस्थित होते.



# जिल्हाभरात मेघगर्जनेसह पावसाच्या दमदार सरी कोसळल्या

## बाजाराचे साहित्य गेले वाहून !

## नदी – नाले खळखळून वाहू लागले











धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – जिल्ह्यात यावर्षी पाऊस वेळेवर सुरू झाला असून या पावसाने सलग दुसऱ्या दिवशी मेघगर्जनेसह दमदार हजेरी लावल्याने नदी – नाले खळखळून वाहू लागले आहेत. तर रविवारी धाराशिव येथील आठवडी बाजारात पाणी तुंबले. पावसाचे पाणी वाहण्याची असलेली नाली तुंबल्यामुळे ते वाहण्यास अडथळा निर्माण झाल्याने बाजारातील चौकात पाण्याचे अक्षरशः तळेच निर्माण झाले. दरम्यान विक्रीसाठी आणलेले साहित्य या तुंबलेल्या पाण्यावर तरंगत पाण्याबरोबर वाहून गेले. त्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले तर बाजारकरुंची प्रचंड दाणादाण उडाली.

शनिवार दि.८ जून रोजी पावसाच्या धारा संपूर्ण जिल्ह्यात कोसळल्या. तर रविवार दि.९ जून रोजी सायंकाळी पाच वाजता पावसाने दमदार हजेरी लावली. तो अगदी धो – धो कोसळत असल्यामुळे क्षणार्धात सर्वत्र पाणी पाणी होऊन पाणी वाहते होऊ लागले. मात्र पावसाचा प्रचंड जोर असल्यामुळे वाहणाऱ्या पाण्याला वाहण्यासाठी व्यत्यय येऊ लागला. तर धाराशिव शहरातील बाजार चौकात झ्रानू जाणारे पाणी तुंबल्यामुळे या चौकामध्ये अक्षरशः तळ्याचे स्वरूप तयार झाले. या ठिकाणी विक्रीसाठी ठेवलेले वह्या, पुस्तके, मसाले पदार्थ, कपडे, चप्पल, भाजीपाला, फळे आदींसह जिवनावश्यक इतर विविध साहित्य क्या तुबलेल्या पाण्यावर तरंगू लागले. विक्रेते ते सामान गोळा करण्यासाठी पराकाष्टा करू लागले मात्र पावसाचा वाहत्या पाण्याचा प्रचंड जवळ असल्यामुळे ते साहित्य पाण्याबरोबर वाहून गेले. त्यामुळे व्यापाऱ्यांचे म्हणजेच विक्रेत्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले तर बाजारकरुंची प्रचंड मोठ्या प्रमाणात दाणादाण उडाली.

### पेरणीसाठी उपयुक्त पाऊस

**यंदा खरिपाची पेरणी वेळेवर होते किंवा नाही, गतवर्षी सारखाच यावर्षी देखील पाऊस लांबणीवर जाणार ? अशी शेतकऱ्यांना चिंता लागू राहिली होती. मात्र नक्षत्र चा पाऊस पहिल्याच दिवशी बसल्यामुळे शेतकऱ्यांच्या अशा पल्लवी झाल्या होत्या. तर हा पाऊस सलग दुसऱ्या दिवशी संपूर्ण जिल्हाभर पडल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर पेरणे करण्यास उपयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वापसा होताच शेतकरी वाड्यावर मूठ धरण्यास सज्ज होणार आहेत. यंदा पाऊसमान चांगला होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### रस्त्यावर लाटांवर लाटांचा खेळ !

**पावसाचे पाणी शहरातील मुख्य रस्ता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या दरम्यान संजीवनी हॉस्पिटल समोर तुंबल्यामुळे नागरिकांना जाणे अवघड झाले. तर वाहनधारक तुंबलेल्या पाण्यातून वाहन घेऊन जाताना दुतर्फा मोठ्या प्रमाणात लाटाच लाटा उसळत होत्या.**

## मोदींनी शपथ घेतल्याचा परंडा येथे जल्लोष



परंडा दि.१० (प्रतिनिधी) – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर परंडा येथे भाजप व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या कार्यकत्यांनी जल्लोष साजरा केला.

परंडा तालुक्यासह शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून मोठा जल्लोष करीत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. जहिर चौधरी, आर. पी.आय (ए) प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, ॲड. संदिप शेळके, धनंजय गायकवाड, परसराम कोळी, साहेबराव पाडुळे, सुजित परदेशी, बाबासाहेब जाधव, विलास खोसरे, सारंग घोगरे, विजय बनसोडे, उमाकांत गोरे, डॉ. अमोल गोफणे, धनंजय काळे, मिलिंद शिंदे, गौरव पाटील, मनोज पवार, सुरज काळे, आदर्श ठाकूर, राहुल फले, नागेश गर्जे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गावालगतच्या प्लॉटिंगमधील दोन प्लॉट नावावर करून देण्याच्या बहाण्याने चार लाखांची फसवणूक

धाराशिव दि१०(प्रतिनिधी) – एकास गावालगत असलेल्या एक एकराच्या प्लॉटमधील दोन प्लॉट नावावर करून देतो अशी बनवाबनवी करून ४ लाख रुपये त्याच्याकडून घेतले. मात्र प्लॉट नावावर करून देण्यास टाळाटाळ करून त्याची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी संबंधित भामट्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथील अनिल लक्ष्मण हिप्परगे यांनी दि.१ ऑगस्ट २०२२ ते दि.२० एप्रिल २०२३ रोजी पावेतो फुलवाडी येथे फुलवाडी येथीलच तानाजी सुभाष हांडगे (वय ३६ वर्षे) यांना हिप्परगे यांच्या गावा शेजारील १ एक्करच्या प्लॉटींगमध्ये ३ प्लॉट नावावर करुन देतो असे म्हणून तानाजी शिंदे यांना विश्वासात घेऊन रोख ४ लाख रुपये घेवून आजपर्यंत प्लॉटींग नावावर न करुन देता शिंदे यांचे पैसे परत न करता विश्वासघात करुन फसवणूक केली. या प्रकरणी तानाजी शिंदे दि. ८ जून रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भा.द.वि. सं. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## प्रा. नागनाथ चोबे यांना पीएचडी प्रधान



परंडा दि१०(प्रतिनिधी) – तालुक्यातील सिरसाव येथील प्रा नागनाथ महादेव चोबे यांना कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. चोबे यांना शिवाजी विद्यापीठाच्या मानवी शास्त्र विद्या शाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएचडी ७ जून रोजी जाहीर करण्यात आली. त्यांनी प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली.... महाराष्ट्रातील भूमिपुत्राचे राजकारण: विशेष संदर्भ मुंबई... या विषयावर सविस्तर मांडणी करत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे शोध प्रबंध सादर केल. प्रा चोबे हे सध्या आर्ट ॲण्ड कॉमर्स कॉलेज नागठाणे येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

## माजी आमदार मोटे यांची परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट



परंडा दि.१० (प्रतिनिधी) – भूम – परंडा – वाशीचे माजी आमदार राहुल मोटे यांनी परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीला दि.९ जून रोजी भेट दिली.

परंडा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती माजी आमदार मोठे यांनी भेट दिली. त्यावेळी त्यांचा सत्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन व उपसभापती संजय पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच संचालक शंकर जाधव व माजी जिप सदस्य मारुती मासाळ यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आमदार मोटे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी संचालक ॲड सुजित देवकते, डॉ. रवींद्र जगताप, बापू मिस्किन, किरण शिंदे यांच्यासह सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, जिल्हा मजूर फेडरेशन संचालक धनंजय हांडे, माजी नगराध्यक्ष नसीर शहाबर्फीवाले, तालुका कार्याध्यक्ष महेश खुळे, डीसीसीचे संचालक हनुमंत कोलते पाटील, शहरध्यक्ष श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, खयुम तुटके, गणी हावरे, ओबीसी सेल जिल्हा उपाध्यक्ष डॉ नवनाथ वाघमोडे, सुधीर वाघमोडे, धनु देशमुख, बंडू रगडे, सुहास पाटील, केशव करळे, भगवान रगडे, मलिक सय्यद, पिंटू कोकाटे, प्रा. शरद झोंबाडे, राहुल गरड यांच्यासह कार्यकर्ते उपस्तित होते.

## सारोळा येथे वृक्ष लागवडीचा महिलांच्या हस्ते शुभारंभ



धाराशिव दि.१०(प्रतिनिधी) – तालुक्यातील सारोळा (बु.) येथे वृक्ष लागवडीचा शुभारंभ महिलांच्या हस्ते दि.७ जून रोजी करण्यात आला आहे. तर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ३५० वृक्षांची दरापुढे लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे हे गाव हिरव्यागार वृक्षांनी नटणार आहे. यासाठी सोरिजीन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने मोहिम हाती घेतले आहे.

विशेष म्हणजे केशर आंबा, नारळ यासह विविध जातींची ३५० पेक्षाही अधिक झाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे संपूर्ण सारोळा गाव आता हिरव्यागार वृक्षांनी नटणार असल्याचे चित्र पहावयास मिळणार आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे.. याप्रमाणे कंपनीने गावात वृक्ष लागवड करण्यासाठी रोपे उपलब्ध करून दिली आहेत. गावांतर्गत रस्त्याच्या कडेला हे वृक्ष लागवड करण्यात येणार आहेत. ग्रामस्थांच्या दारामध्ये केशर आंबा, नारळ या फळासह ऑक्सिजन देणारी विविध जातींच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. गावातील श्री मारुती मंदिर, श्री गणेश मंदिरापासून याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच निर्मलाताई चंदने, कंपनीच्या वनिता गणेशन, मोहन कुमार, अमलन योती बहेरा, अरविंद कुमार, द्रुवसिंग कुमार, संतोष मुल्ला, कृष्णा जाधव, राजेश पिंडे, गोविंद सिंग, उपसरपंच वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य तुकाराम रणदिवे, तंटामुक्त समितीचे उपाध्यक्ष चंद्रकांत मसे, विनोद बाकले, नितीन चंदने, सावन देवगिरे, छत्रपती उदारे, माजी ग्रामपंचायत सदस्य अमोल कठारे, दादा सुरवसे, मुंडे, बारटक्के, पडवळ, मगर, महावीर काकडे, भैय्या मसे, संजय पवार, राजेश मसे, ज्योतिराम रणदिवे, मारूती रणदिवे, विनोद शिंदे, बाळासाहेब परिट, भिमा गाडे, पप्पू कासार, सुरेश कठारे, ग्रामपंचायतचे लिपिक पांडुरंग रणदिवे, सेवक शैलेश शिंदे, दत्ता बगाडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षण मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन



धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे हे दि.८ जूनपासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या उपोषणाला जिल्ह्यातील सकल मराठा समाजा तर्फे पाठिंबा व सरकारने येत्या २ दिवसांत दखल न घेतल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा एका निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षकांना दि.१० जून रोजी दिला आहे.दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवली (सराटी) येथे जरांगे यांचे अमरण उपोषण सुरु आहे. शासनाने याची आज तागायत कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. त्यामुळे वाशी येथे ठरल्याप्रमाणे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करण्यात यावी. तर मराठा कुणबी एकच आहेत त्याचा अध्यादेश काढावा. तसेच सुडाच्या भावनेतून हजारो मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत. तर हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट व बॉम्बे गॅझेट लागू करण्यात यावे. तसेच शिंदे समितीस मुदतवाढ देऊन समितीचे काम सुरुच ठेवावे, तर ज्या मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे, त्याचा डाटा प्रसिध्द करण्यात यावा. तर श जातीय तेढ निर्माण करण्याच्या वाईट उद्देशाने सोशल मिडीयावरती व जाहीर सभेमध्ये आक्षेपार्य विधान करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच धाराशिव येथील जात पडताळणी समितीने मराठा कुणबी, कुणबी मराठा व कुणबी प्रमाणपत्राची पडताळणी लवकरात लवकर करुन देण्यात यावी. तर याच समितीस सूचित करावे की, मुळ रेकॉर्डसाठी वारंवार न बोलावता एकदाच बोलावून स्कॅन करुन घ्यावे. कारण रेकॉर्ड सतत बोलावल्यामुळे रेकॉर्ड नष्ट व खराब होण्याची दाट शक्यता आहे. तसेच या मागण्या २ दिवसांमध्ये मान्य कराव्यात. अन्यया तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे. यावर ॲड धैर्यशील गोकले. ॲड घनश्याम रितापूर, बलराज रणदिवे, नितीन सुर्यवंशी, अक्षय नाईकवाडी, मुकुंद घाटगे, मनोज जाधव, विजय मटे, संभाजी फरताडे, प्रकाश पाटील, काकासाहेब लोमटे आदींसह इतरांच्या सह्या आहेत.

# पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये

लातूर, / प्रतिनिधी– जिल्ह्यात १० जून २०२४ अखेर सरासरी ७२.१ मिलीमीटर पाऊस झालेला असून शेतकऱ्यांनी पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवा पेरणी करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे. जिल्ह्यात लागवडी लायक ६.६५ लाख हेक्टर क्षेत्र असून पेरणी योग्य क्षेत्र ६.४० लाख हेक्टर आहे. जिल्ह्यात सोयाबीन हे खरीपाचे प्रमुख पीक आहे.

सोयाबीन पीकास पेरणीसाठी साधारणपणे ७५ ते १०० मिलीमीटर पावसाची (३ मोठे पाऊस) आवश्यकता असते. ज्या भागामध्ये अशा प्रकारचा पेरणी योग्य पाऊस झालेला नाही त्या शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे त्यांनी म्हटले आहे.

ज्या भागात पेरणी योग्य पाऊस झालेला आहे, अशा ठिकाणी पेरणी करताना बियाणे साधारणपणे २ ते ३ सेंटीमीटरपेक्षा खाली जाणार नाही, याची दक्षता घेऊन पेरणी करावी. बियाणे २ ते ३ सेंटीमीटरपेक्षा खाली गेल्यास बियाण्याची उगवण कमी प्रमाणात होत असल्यामुळे बियाणे वाया जाण्याची दाट शक्यता असते. या बाबत अधिक माहितीसाठी सबंधित कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक अथवा मंडळ कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या लातूर तालुक्यात ७८.६, औसा तालुक्यात ८६.९, रेणापूर तालुक्यात ८७.४, निलंगा तालुक्यात ६२.२, देवणी तालुक्यात ८०.४, उदगीर तालुक्यात ७४.१, अहमदपूर तालुक्यात ५१.४, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ६१.६, जळकोट तालुक्यात २५.८, चाकूर तालुक्यात ७६.९ मिलीमीटर पाऊस झालेला आहे.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी



लातूर, ता.०९ : दयानंद वाणिज्य महाविद्यालयात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांचे हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, महाराणा प्रताप यांच्या चरित्रातून देशभक्ती, स्वाभीमान, शौर्य, वीरता, धाडस इत्यादि गुण आजच्या पिढीस सदैव प्रेरणादायी ठरतील. त्यांचे चरित्र आवर्जून वाचावे. यावेळी ग्रंथपाल प्रा.विठठल जाधव यांनी महाराणा प्रताप यांची जीवनगाथा थोडक्यात विषद केली. कार्यक्रमास बीसीए विभागप्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, प्रा. नंदकूमार पाटील, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकरसह, शिवाजी पांचाळ, ग्रंथालय लिपिक लक्ष्मीकांत वाघ यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# शिरूर आनंतपाळ येथे गुणवंताचा सत्कार

शिरूरआनंतपाळ : श्री अनंतपाळ बहुद्देशीय विकास संस्थेकडून शिरूर आनंतपाळ शहरातील ईयत्ता १० वी व १२ वी तसेच नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शालश्रीफळ , पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.तसेच त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थाध्यक्ष बापूराव देवंगरे, उपाध्यक्ष किशन राव इदंलकर यानी मनोगत व्यक्त केले. सत्कारमूर्ती मंथन हसबे व पालक प्रतिनिधी विद्यासागर वाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.आभार विजयकुमार संभाळे यानी मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन बालाजी येरोळे यानी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सदस्य उमाकांतराव देवंगरे, शंकरराव बेबंळगे ,वैजनाथराव नाब्दे, बालाजी यरमलवार,गुंडेराव आवाळे ,शिवाजी मुदाळे, मुक्तार देशमुख यांनी परिश्रम घेतले.



# विवेकी व्यक्तीकडूनच बुद्धीचा सकारात्मक वापर होतो :जोशी

लातूर/ प्रतिनिधी: मानवाकडे केवळ बुद्धी असून चालत नाही तर विवेकही असावा लागतो. विवेकानुसार वागणारा व्यक्ती बुद्धीचा सकारात्मक वापर करतो. मन सकारात्मक व परिपूर्ण असावे यासाठी मार्गदर्शन देण्याचे काम ग्रंथांच्या माध्यमातून केले जाते,असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भैय्याजी जोशी यांनी केले.

भारतीय शिक्षणावर आधारित ज्ञानसागर महाप्रकल्पाच्या १०५१ ग्रंथांच्या लोकार्पण सोहळ्यात भैय्याजी जोशी बोलत होते.भारतीय शिक्षण प्रसारक संस्था व श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम दयानंद सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमास पुनरुत्थान विद्यापीठाच्या कुलपती श्रीमती इंदुमतीताई काटदरे,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या देवगिरी प्रांताचे संघचालक अनिलजी भालेराव,भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य,राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयाचे चेअरमन आनंद लाहोटी यांची मंचावर उपस्थिती होती.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM VIJAYKUMAR SANTRAM MAHAWARKAR TO VIJAYKUMAR SANTRAM MAHAVARKAR HENCE FOR THIS DECLERETION IN FUTURE I WILL USE THIS NAME VIJAYKUMAR SANTRAM MAHAVARKAR THE SAME NAME WILL BE USED BY MY HUSBAND / WIFE AND CHILDREN

**OLD NAME**
VIJAYKUMAR SANTRAM MAHAWARKAR
**NEW NAME**
VIJAYKUMAR SANTRAM MAHAVARKAR
**ADDRESS**
Nanded Road Gawali Nagar, Vivekanand Chowk, Latur Maharashtra 413512

**हरवले आहे**

स्नेहल सुनिल येलमोटे या नावाची, शारदा ज्युनिअर कॉलेज, लातूर अंबाजोगाई रोड, लातूर या महाविद्यालयाची इयत्ता १२ पासची टी.सी. अहमदपूर ते लातूर बसमध्ये प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मोबा–७६२०५०३२७२**

**जाहीरनामा**
**तहसील कार्यालय जळकोट**
**(शाखा दंडणीय)**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.०३/०६/२०२४**

ज्याअर्थी अर्जदार भाऊसाहेब बालाजी पवार वय ४७ वर्ष रा. हावरगा ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलीच्या नामे मानसी भाऊसाहेब पवार यांचा जन्म मौजे हावरगा ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक २१/०६/२००६ रोजी झाला असुन जन्म–मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील मानसी भाऊसाहेब पवार यांचा जन्म दिनांक २१/०६/२००६ रोजीची नोंद जन्म–मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मानसी भाऊसाहेव पवार यांचा जन्म दिनांक २१/०६/२००६ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु मानसी भाऊसाहेब पवार यांचा जन्म दिनांक २१/०६/२००६ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय हावरगा ता. जळकोट जि.लातुर येथे जन्म–मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०३/०६/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख ०३/०७/२०२४

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जळकोट**

# डॉ. संदीपान जगदाळे घेणार अनाथ विद्यार्थिनी व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पालकत्व

## राज्य शिक्षक पुरस्काराच्या रकमेचा करणार विनियोग

ला.दि.३ दयानंद कला महाविद्यालयातील प्रा. डॉ. संदिपान जगदाळे यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने ५ सप्टेंबर २०२३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारातून त्यांना १ लक्ष १० हजार रुपये मिळाले आहेत. तो निधी वैयक्तिक कार्यासाठी न वापरता शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी वापरण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे. त्यातून त्यांनी यापूर्वी मतदार जनजागृती पोवाड्याची निर्मिती करून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले आहे.चालू शैक्षणिक वर्षापासून कोरोना किंवा अन्य कारणास्तव ज्यांचे पालकत्व हरवले आहे अशा निराधार विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत तसेच जे विद्यार्थी दिव्यांग आहेत त्यांनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे शैक्षणिक पालकत्व घेण्याचा संकल्प डॉ. जगदाळे यांनी केला आहे. ज्या विद्यार्थिनींचे छत्र हरवले आहे अशा विद्यार्थिनी निराशेच्या गर्तेत जातात. आर्थिक अडचणीमुळे त्यांचे शिक्षण थांबलेले असते. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. म्हणून अशा विद्यार्थ्यांचे मनोबल उंचवावे व त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासातील अडसर दूर व्हावी या उदात्त हेतूने डॉ. जगदाळे यांनी अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या अनाथ विद्यार्थिनी व दिव्यांग विद्यार्थी दयानंद कला महाविद्यालय,लातूर येथे इयत्ता ११ वी साठी प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांची इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वीचे प्रवेश शुल्क, वह्या, पुस्तके,पेन, पेन्सिल, कंपास इ.शैक्षणिक साहित्य,गणवेश व बारावी बोर्ड परीक्षेचे परीक्षा शुल्क भरून त्याचे शैक्षणिक पालकत्व घेणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व डॉ.संदीपान जगदाळे यांनी केले आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल डॉ. जगदाळे यांचे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, विभागीय राज्य मंडळ अध्यक्ष सुधाकर तेलंग, सहाय्यक शिक्षण संचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, डायट प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितभाई शाह,रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी अभिनंदन केले आहे.

**जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार अंजली बालासाहेब गंगने रा. श्रीनगर, लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, खरेदीखत क्र. २२४२/२००७ दि.२९/०६/ २००७ रोजी खरेदी केलेला लातूर मनपा हद्दीतील श्रीनगर भागातील जमीन सर्वे क्र. २३५/१ पैकीचा एन.ए.क्र. १९८३/आरबी/डेस्क/जेएमबी/आरआर/३९५ दि. १७/०१/१९८४ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी मंजुर केलेल्या पैकीचा प्लॉट क्र.३ चा उत्तर भाग, याचा मनपा क्र. ए५–४३५–१ असून याची रुंदी दक्षिण उत्तर ६ मिटर व लांबी पूर्व पश्चिम–१८ मिटर याचे एकुण क्षेत्रफळ १०८ चौ. मीटर असून याची चतुः सिमा, पुर्वेस : ९ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस– एम.आय.डी.सी.जागा, दक्षिणेस : सदरील प्लॉटचा उर्वरित भाग, उत्तरेस : प्लॉट क्र. २. येणेप्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील प्लॉटचे मुळ मालक सुधाकर सोपानराव घोरबांड रा. जळकोट ता. जळकोट जि. लातूर यांनी वर नमुद प्लॉट प्रसाद मारुती आगाशे रा. बार्शी रोड, अम्लेश्वर नगर, ५ नंबर चौक लातूर यांना विक्रीचा ठराव केला आहे व त्यांनी त्या ठरावपत्राआधारे वर नमुद प्लॉट माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन, ठरावापोटी कांही रक्कम इसार म्हणुन स्विकारली आहे व प्लॉटचे मुळ मालक यांच्याकडुन माझे पक्षकाराचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन देण्याची हमी व विश्वास दिला आहे. तरी सदरील प्लॉटबाबत कोणाचा काही हक्कसंबंध, हितसंबंध, कर्जबोजा, दान, गहाण, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, वाटणी, वारसाहक्क, न्यायालयीन वाद इ. कांही असल्यास त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत माझे खालील कार्यालयीन पत्त्यावर लेखी उजर कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीत कोणाचा कांही उजर नाही आल्यास सदर प्लॉट सर्वतोपरी निर्वीवाद आहे असे समजुन माझे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर आलेले उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन. दिनांक : १०/०६/२०२४

तर्फे :
**ॲड.पी.व्ही. कलुरे,**
**बचत भवन समोर, लातूर.**
**मो.क्र. ९८८१०५४२७५**

**जाहीर प्रगटन देणार**
**अंजली बालासाहेब गंगने**
**मो.क्र. ८४८४८८६५२०**

# शौर्य शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांनी पराभव पचवायला शिकविले :प्रा.दुडिले

लातूर / प्रतिनिधी– महाराणा प्रताप सिंह यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात विविध लढाया केल्या. यामध्ये त्यांना सतत विजय प्राप्त झाला. मात्र कधी कधी पराजयाला सुद्धा सामोरे जावे लागले. अशावेळी ते पराभवाने खचून न जाता नव्या उमेदीने त्यांनी अनेक लढाया जिंकून प्रजेला पराभव पचवायला शिकविले, असे प्रतिपादन व्यवसाय शिक्षण विभागाचे प्रा. व्यंकट दुडिले यांनी केले.श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र शासन, जयंती उत्सव समिती, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (व्यवसाय शिक्षण विभाग), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराणा प्रतापसिंह यांची जयंती प्राचार्य कक्षामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. श्रीनंद पाटील, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. दयानंद टेंकाळे, प्रा. टी. घनश्याम यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.पुढे बोलताना प्रा. व्यंकट दुडिले म्हणाले की, मेवाडची राजधानी चितोड ही महाराणा प्रतापांची मुख्य राजधानी होती. महाराणा प्रतापांना असे वाटत होते की, आपण अकबरा सारखा राज्यकारभार करावा. मारवाडचा राजा चंद्रसिंग यांचा आदर्श त्यांच्यासमोर होता. महाराणा प्रताप यांची कार्य करण्याची शैली ही समाजाभिमुख होती. ते एक उत्कृष्ट लेखक सुद्धा होते. त्यांनी विश्ववल्लभ व व्यवहार संस्कृती असे दोन ग्रंथ लिहिले. हा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव म्हणाले की, आपल्या महाविद्यालयात आज महाराणा प्रतापसिंह यांची जयंती आपल्या सर्वांच्या उपस्थीतीत संपन्न होत आहे याचा मनस्वी आनंद आहे. जयंती उत्सवाच्या निमित्ताने आपण सर्व एकत्रित येतो. महापुरुषाच्या विचाराचे वाचन केले जाते.

**पान १ वरून**

**एनडीए...**

कुमारस्वामी यांना अवजड उद्योग मंत्रालय, ज्योतिरादित्य शिंदे यांना टेलिकॉम मंत्रालय, अश्रि्वनी वैष्णव यांना माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि टीडीपी नेते राममोहन नायडू यांच्याकडे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मंत्र्यांना कोणती खाती मिळाली?

कॅबिनेट मंत्री

१) नितीन गडकरी : रस्ते आणि परिवहन वाहतूक

२) पियुष गोयल : वाणिज्य राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

३) प्रतापराव जाधव : आयुष, आरोग्य राज्यमंत्री

१) रामदास आठवले : सामाजिक न्याय

२) रक्षा खडसे : क्रीडा आणि युवक कल्याण

३) मुरलीधर मोहोळ : सहकार व नागरी उड्डाण

मोदींच्या मंत्रिमंडळात कुणाला कोणतं मंत्रालय?

अमित शाह – गृहमंत्रालय
राजनाथ सिंह – संरक्षण मंत्रालय
एस जयशंकर – परराष्ट्र
निर्मला सीतारमन – अर्थमंत्रालय
शिवराज सिंह चौहान– कृषी मंत्रालय
जतीन राम – सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय
अन्नपूर्णा देवी – महिला आणि बाल विकास मंत्रालय
भूपेंदर यादव – पर्यावरण
राम मोहन नायडू – नागरी उड्डाण मंत्रालय
जेपी नड्डा – आरोग्य मंत्रालय
सर्वानंद सोनोवाल – पोर्ट शिपिंग मंत्रालय
सी आर पाटील – जलशक्ती
किरण रिजीजू – संसदीय कार्यमंत्री
धर्मेंद्र प्रधान – शिक्षण मंत्री

राज्यमंत्री

श्रीपाद नाईक– गृहनिर्माण आणि ऊर्जा राज्यमंत्री
शोभा करंदाजे – राज्यमंत्री – सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय
शांतनु ठाकुर – पोर्ट शिपिंग मंत्रालय, राज्यमंत्री


**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४–६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३–३४ | | ६८–८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५–७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८–८६ | | ७२–२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय–अस्त | | सिंगल:९–५–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७–४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय–अस्त | | सिंगल:०–३–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४–० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय–अस्त | | सिंगल:७–१–४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०–७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

मंगळवार दि. ११ जून २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# निराधार विठ्ठलाची शासन दखल घेणार का ?

## सतत १५ वर्षापासून निराधार मोरे बनले वन्य प्राण्यांचा आधार .. !



**जळकोट (माधव होनराव)** गेल्या पंधरा वर्षापासून मौ. होकर्णा ता. जळकोट जि. लातूर येथिल विठ्ठल मोरे हे वन्य प्राण्यांची सेवा करत आहेत. उन्हाच्या वाढत्या तापमानामुळे वन्य प्राण्यांना प्यायला पाणी मिळत नाही. त्यांचे काय हाल होत असतील ? मुक्या प्राण्यांना पाण्यासाठी वनवन भटकून सुद्धा पाणी मिळत नाही, या विचाराने त्यांना पाणी पाजण्याचं काम निरंतर ते करत आहेत. माळरानावर राहणाऱ्या हरिण, वानर, मोर, चिमण्या, ससे, कोल्हे अन्य प्राणी मोठया संख्येने येऊन त्या ठिकाणी येऊन पाणी पितात. या कामासाठी त्यांना कूठल्याही प्रकारची आर्थिक मदत केली जात नाही. ते स्वतः निराधार आहेत, परंतु हेच निराधार वन्य प्राण्यांचे आधार बनले आहेत.

विठ्ठल मोरे यांना पत्नी, मुलं नाहीत. ते एकटेच निराधार आहेत. पावसाळा सुरू झाला की प्रत्येक वर्षी मुंबईला जायचं तेथे आठ महिने काम करायचे. उन्हाळ्यात माळरानावरचं पाणी आटलं की, पुन्हा गावाकडे यायचं स्वखर्चातून टँकरने पाणी घेऊन वन्य प्राण्यां ची तहान भागवायची तसेच जि. प. शाळेतील मुलांना वह्या वाटप करणे, शहिद जवानांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या खात्यात पैसे जमा करणे, अतिवृष्टी झालेल्या भागात शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासनाच्या खात्यामध्ये पैसे जमा करणे अशी सेवाभावी वृत्ती ते जोपासतात. कोणत्याही आर्थिक मदतीपासून व पुरस्कारापासून कोसो दूर असलेल्या निस्वार्थी ध्येयवेड्या विठ्ठल मोरे यांची दखल शासन कधी घेणार ? याबाबत जळकोट तालुक्यातील जनतेला शासनाकडून न्यायाची अपेक्षा आहे. खरोखरचं त्यांच्या याकार्याला सलाम .. !

# आर्य वैश्य ऑफिशियल अँड प्रोफेशनल असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबीर




**उदगीर (प्रतिनिधी)** आर्य वैश्य ऑफिशियल अँड प्रोफेशनल असोसिएशन उदगीर च्या वतीने संस्थापक सचिव कै.प्रा. सुनील वट्टमवार यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन माननीय सिद्धेश्वर (मुन्ना)पाटील मा.सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर यांच्या हस्ते झाले.तब्बल ६५ रक्तदात्यांनी रक्तदान करून कै प्रा सुनील वट्टमवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.या शिबीरास अंबरखाने ब्लड बँक व राधाई ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी AVOPA या संघटनेचे विविध उपक्रमांची समाजाला आवश्यकता आहे. समाज उपयोगी कार्य करण्यासाठी ही संघटना तयार आहे. बाल वाचनालय,विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य, निराधार नागरिकांना किराणा घरपोच वितरण या सर्व योजनांच्या माध्यमातून ही संघटना समाजसेवा करीत आहे. यांचे कार्य उल्लेखनीय आहे.या विविध उपक्रमासाठी ५१ हजार रुपये देणगी या संघटनेला श्री सिद्धेश्वर (मुन्ना)पाटील यांनी दिली आहे. तसेच विजयकुमार भीमाशंकर पारसेवार यांनी साऊंड सिस्टिम संच भेट दिला व यास संध्या सुनील वट्टमवार यांनी पाच हजार रुपयाची देणगी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष श्री बाळकृष्ण मुक्कावार, प्रमुख अतिथी श्री सिद्धेश्वर( मुन्ना)पाटील ,श्री प्रल्हाद बोथीकर ,विजयकुमार पारसेवार,संदीप मोदी, संचालक सतीश उस्तूरे ,संस्थापक अध्यक्ष प्रा डॉ दीपक चिद्दरवार, अध्यक्ष संजय चन्नावार , सचिव विजयकुमार गबाळे, कोषाध्यक्ष राकेश पांपट्टीवार, प्रकल्प प्रमुख ज्ञानेश्वर पारसेवार, सहप्रकल्प प्रमुख अनिरुद्ध मुक्कावार, बालाजी बुन्नावार,अनिल मारमवार, संजय पत्तेवार, शंकर मुक्कावार, बालाजी पत्तेवार ,देविदास पारसेवार, संतोष मुर्के ,विठ्ठल बावगे, संतोष कोटगीरे ,व्यंकटेश पारसेवार, योगेश जळकोटे, संदीप मुक्कावार , डॉ चंदावार, डॉ मालशेटवार, डॉ गुजलवार यांनी परीश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा डॉ दीपक चिद्दरवार ,मनोगत ज्ञानेश्वर पारसेवार,सूत्रसंचालन विजयकुमार गबाळे व आभार प्रदर्शन प्रा. संजय चन्नावार यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २५ वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण

## पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पक्षाच्या ध्वजाचे ध्वजरोहण




**उदगीर (प्रतिनिधी)** समता, बंधुता, एकता व अखंडता यासाठी लढणारा पुरोगामी विचारांचा कृतीशील पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची देशभरात ओळख आहे आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा रौप्य महोत्सवी वर्ष असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त निमित्त राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजयजी बनसोडे यांच्या मार्गदर्शना नुसार प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत ना.संजय बनसोडे यांच्या संपर्क कार्यालयासमोर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी ध्वजारोहण केले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस समीर शेख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, तालुका कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शहर कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, शाम डावळे, नवनाथ गायकवाड, अ‍ॅड.दिपाली औटे, अनिल मुदाळे, नजीर हाश्मी, फ्फैजुखाँ पठाण, फ्फय्याज शेख,बाळासाहेब मरलापल्ले, प्रभाकर पाटील, उदय मुंडकर, सुनिल केंद्रे, इब्राहिम देवर्जनकर, समद शेख, हुसनाबानो शेख, राजकुमार बिरादार, मदन पाटील, अरविंद गिलचे, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, राहुल सोनवणे, संघशक्ती बलांडे, इब्राहिम पटेल, रोहिदास कुंडगीर, मदन पाटील, मुकेश भालेराव, महेश बिरादार, सिध्दार्थ सुर्यवंशी, अझहर मोमीन, युवराज कांडगीरे, दिनकर बिरादार, रऊफ्फ थोडगे, फ्फेरोज पठाण, अबरार पठाण, अक्रम जहागीरदार, खाजा पटेल, अखिल मोमीन, सय्यद शेरू, सुग्रीव सुर्यवंशी,आदी उपस्थित होते.

# श्यामलाल अकॅडमी तर्फे परदेशी शिक्षणाच्या (Abroad Education )सुवर्णसंधी

**बारावी नंतर काय? सेमिनार व आजच प्रत्यक्ष प्रवेशाचे आयोजन**

**उदगीर (प्रतिनिधी)** अब्रॉड एज्युकेशन कन्सल्टन्सी, पुणे व श्यामलाल कला, क्रीडा व विज्ञान अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने उदगीर शहरातील बारावी पास झालेल्या सर्व विद्यार्थी व पालकांच्या मार्गदर्शनासाठी परदेशी शिक्षणाच्या प्रवेशाच्या माहितीचे सेमिनार दिनांक ११ जून २०२४ रोजी ठीक ११ वाजता श्यामलाल ज्युनिअर कॉलेज सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले आहे.

जागतिकीकरणामुळे जगामध्ये सर्वत्र शिक्षणाच्या वाटा खुल्या झालेल्या आहेत. जागतिक पातळीवर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या सेमिनारचे आयोजन केले आहे. देशात ज्यांना संधी उपलब्ध नाहीत अशांना परदेशात शिक्षणाच्या संधी कमी खर्चात व अत्याधुनिक सोयीसुविधानुरूप उपलब्ध आहेत.

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. सुपोषपाणी आर्य यांच्या संकल्पनेतून आणि अब्रॉड एज्युकेशन कन्सल्टन्सी, पुणे द्वारा उदगीर शहरात पहिल्यांदाच या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनार अंतर्गत जगातील सर्वोत्कृष्ट जागतिक विद्याशाखा अंतर्गत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळते. बाहेर देशातील विज्ञान शाखे अंतर्गत MBBS, ENGINEERING तसेच कला व वाणिज्य शाखेमधील करियर निवडीवर आधारित प्रदेशातील योग्य अभ्यासक्रम निवडण्यात या सेमिनारची मदत होते. N.P. Ogarev Mordovia State University, Ulyanovsk State University, KBFU, Immanuel Kant Baltic Federal University,North Ossetian State Medical Academy, St Petersburg University या सर्व जागतिक विद्यापीठाची अब्रॉड एज्युकेशन कन्सल्टन्सी पुणे सलग्नित आहे.

युरोप ते आशिया खंडापर्यंत पसरलेले रशिया हा देश भारताचा सहयोगी देश आहे . भारतीय मेडिकलच्या विद्यार्थ्यांसाठी कमी खर्चात शिक्षणासाठी रशिया हे चांगले ठिकाण मानले जाते. बाहेर देशातील शिक्षणासंबंधी मुलांमध्ये व पालकांमध्ये अनेक संभ्रमावस्था असतात. ही संभ्रमावस्था दूर करण्यासाठीच या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. तरी उदगीर नगरीतील सर्व पालकांनी व विद्यार्थ्यांनी आपली स्वप्नपूर्ती पूर्ण करण्यासाठी आयोजित केलेल्या सेमिनार मध्ये उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. प्राध्यापक शिवरुद्र पाटील मो.न. ९९७०८३८१०१ वर संपर्क साधून आजच आपली नाव नोंदणी करावी.

# खा.काळगेच्या विजयाचा सोमवारी अभिषेकांने अतनूरात जल्लोष



**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर लोकसभा मतदार संघातून अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे डॉ.शिवाजी बंडप्पा काळगे प्रचंड बहुमताने विजयी झाल्यास अतनूर येथील संजीवन जिवंत समाधी घेतलेले श्री.घाळेप्पा स्वामी महाराज तथा काशी विश्वनाथ महाराज मठ संस्थानात सोमवारचा जल अभिषेकांने जल्लोष करण्याचे वृत्त घेतलेले येथील माजी सैनिक तथा पिंढयान पिढ्यांचे काँग्रेस पक्ष समर्थक काँग्रेस जळकोट तालुकासरचिटणीस अरविंद सासट्टे अतनूरकर यांनी आज सोमवारी दि.१० जून रोजी सकाळी हा कार्यक्रम संपन्न केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्त्यांनी मोठया प्रमाणात हजेरी लावत ढोल ताशांच्या तालावर नाचत, फ्फटाके वाजवून, पेढे व प्रसाद वाटप करित जल्लोष साजरा केला.

या वेळी काँग्रेस आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा शीलाताई पाटील राजूरकर अतनूर-गव्हाणकर, राष्ट्रवादीचे राज्याचे युवक मराठवाड्याचे युवानेते चंदन पाटील नागराळकर, गजानन सताळकर, राष्ट्रवादीचे नेते शिवाजी मुळे, बँकेचे संचालक तथा तालुकाअध्यक्ष मारोती पांडे, ज्ञानेश्वर पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती जळकोटचे संचालक आशिष पाटील राजूरकर, शिवसेनेचे जळकोट तालुकाप्रमुख मुक्तेश्वर पाटील, जळकोट तालुकासरचिटणीस तथा माजी सैनिक अरविंद सासट्टे अतनूरकर, ओबीसींचे तालुकासचिव गोविंद कोकणे, अतनूर तंटामुक्त अध्यक्ष मगदूम मुंजेवार, संग्राम घुमाडे, नितीन सोमुसे, कैलास सोमसे-पाटील, शफ्फियोददिन मुंजेवार, अकबर आत्तार, अहेमद शेख, पाटील सह अनेक नेते, कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.


# घर विकणे आहे

**शिवाजी महाविद्यालय/ विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८० ८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेल्या ३१ रुम विकणे आहे.**

**संपर्क ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२**


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार प्रकाश यलप्पा पवार रा. शेडोळ तां. निलंगा यांनी सांगितलेवरून कागदपत्रे व माहीती देवून अधिकृत केल्यावरून सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येते.

हे की, प्रकाश यलप्पा पवार हे मौजे निडेबन, ता. उदगीर येथील मिळकत क. सर्वे क्र..२/ग, प्लॉट क्र. ८ ग्रामपंचायत क.५८३ क्षेत्र १३०० चौ. फ्फुट ज्याची चतुःसिमा पुर्वेस प्लॉट क. २२, पश्चिमेस : २० फ्फुट रोड, दक्षिणेस: बालाजी धमणसुरे यांचे घर व उत्तरेस शेख पाशा महेबुब यांचा प्लॉट क्र. ९ येणेप्रमाणे वरील मिळकतीचे मालक प्रकाश यलप्पा पवार हे असून सदरील मिळकतीचे पुर्वीची मुळ खरेदीखत ज्याचा दस्त क.१६८७/२०१९ दि.११.०३.२०१९ ही प्रत माझेकडून गाडीवर जात असताना म्हणजेच नांदेड बिदर रोड वरुन जात असताना कोठेतरी गहाळ झालेले आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीचे मुळ खरेदीखत दस्त क्र. १६८७/२०१९ दिनांक ११.०३.२०१९ कोणास सापडले असेल तर त्याची प्रत खालील जाहीर प्रगटन देणार यांना देण्यात यावी ही विनंती.

सबब हे जाहीर प्रगटन दिनांक ०८.०६.२०२४ रोजी प्रसिध्दीस दिले.

जाहिर प्रगटण देणार
प्रकाश यलप्पा पवार

तर्फे
एन.एल. मध्वरे
उदगीर मो.क्र. ९४२२२४३५०७